# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## <u>सर्व साधारण सभा</u>

गुरुवार दि. २७.८.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी,महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कोकाटे नागाबाई भुजंगराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खा इलियाज खॉ | कल्याणकर बालाजी देविदासराव |
| भवरे किशोर दामोधर | कदम शीला सुनिल |
| खेडकर प्रमोद मुरलीधरराव | कनकदंडें मोहिनी महेशराव |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | उमरेकर अशोक रावण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजियाबेगम अयुबखान |
| देशमूख बाळासाहेब गंगाधराव | गफारखान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपत गुणाजी | अनुजा अमितसिंह तेहरा |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | अ.सत्तार अ.गफुर |
| असीयाबेगम अ.हबीब बागवान | स.शेर अली स.महेबुब अली |
| कुरेशी चॉदपाशा खाजा | फारुख हुसेन कासिम साब |
| जकिया बेगम स.मुखतार | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| खोमणे सुदर्शना महेश | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला |
| सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी**, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त,(बिएसयुपी),श्री प्रमोद येवले, उपआयुक्त, (प्रशासन), श्री आर.एस.कोलगणे,मुख्य लेखापरिक्षक,डॉ.असिफ, प्र. मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, श्री सुग्रीव अंधारे, अभियंता बिएसयुपी, श्री गिरीष कदम, का.अभियंता सा.बा.वि. व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**बाळासाहेब तरोडेकर** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे नुकतेच दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्याना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** भारताचे राष्ट्रपती मा.श्री प्रणव मुखर्जी यांच्या पत्नीचेही दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**गफार खान** महाराष्ट्रातील दलित नेते माजी खासदार व केरळ राज्याचे माजी राज्यपाल डॉ.रा.सु.गवई यांचे दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, मा.श्री प्रणव मुखर्जी यांच्या पत्नी, महाराष्ट्रातील दलित नेते माजी खासदार व केरळ राज्याचे माजी राज्यपाल डॉ.रा.सु.गवई यांचे दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना दोन मिनिटे उभे राहुन भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र.१७** **ठराव**

भारताचे लोकप्रिय माजी राष्टपती ,विश्वविख्यात वैज्ञानिक भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते तसेच त्यांच्या कुंटुंबियावर ओढावलेल्या दु:खात ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सहभागी होते.

**ठराव क्र.१८** **ठराव**

भारताचे राष्टपती ,मा.प्रणव मुखर्जी यांच्या सुविद्य पत्नीचे वृध्दपकाळाने दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते तसेच त्यांच्या कुंटुंबियावर ओढावलेल्या दु:खात ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सहभागी होते.

**ठराव क्र.१९** **ठराव**

महाराष्टातील दलित नेते माजी खासदास व केरळचे माजी राज्यपाल कै. रा.सु.गवई यांचे दु:खद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते तसेच त्यांच्या कुंटुंबियावर ओढावलेल्या दु:खात ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सहभागी होते

**प्रमोद खेडकर** नियमानुसार अर्धा तास हा प्रश्नोत्तराचा तास असल्यामूळे प्रथम अर्धातास स.सदस्यांना विचारलेल्या प्रश्नावर चर्चा करण्यात यावी त्यानंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

**महापौर** स.सदस्यानी नियमानुसार सभेच्या तीन दिवस अगोदर प्रश्न/ प्रस्तावाची नोटीस दिलेली असेल त्यास महापौरांनी मान्यता दिल्यानंतर अशा प्रश्नावर प्रसतावावर चर्चा करता येते.प्रथम विषय पत्रिकेवरील विषयावर चर्चा करुन निर्णय घेता येतील त्यानंतर स.सदस्यांनी प्रश्न विचारावे.

**बाळासाहेब तरोडेकर** नियमानुसार पहिले अर्धा तास प्रश्नोत्तर घेण्यात यावे.

**महापौर** नियमानुसार स.सदस्यांनी प्रश्न/प्रस्ताव दिलेले नाही.प्रश्न मांडावयास परवानगी द्यावयाची किंवा नाही याबाबचे अधिकार पिठासिन अधिकारी यांना आहेत सभागृहात सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पिठासिन अधिका-याची असून स.सदस्यांनी गैरवर्तणूक केली तर त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात येइल स.सदस्यांनी तशी वेळ येवू देवू नये.

**बाळासाहेब तरोडेकर** स.सदस्यांच्या भावनाचा आदर करुन स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर प्रथम चर्चा करण्यात यावी त्यानंतर विषयपत्रीकेवर चर्चा करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. आम्ही कोणतेही गैरवंर्तन करीत नाही .

**फारुख अली खा** पिठासिन अधिका-यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे विषय पत्रिकेवरील कामकाजास सुरवात करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** जेष्ठ सदस्यांचे काही महत्वाचे प्रश्न असतील तर ते त्यांना मांडुन देण्याची परवानगी देण्यात यावी.

**प्रमोद खेडकर** आम्ही आमच्या जागेवर उभे राहुन प्रश्न मांडत आहोत कोणतेही गैरवर्तन करीत नाही सभागृहात आम्हाला प्रश्न मांडण्याचे अधिकार आहेत.नगरसचिवानी दि.३१.३.२०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२४५ हा वाचुन दाखविण्यात यावा.

**नगरसचिव** सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२४५ वाचून दाखविण्यात येतो. मनपा हद्दीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम,कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते .या उपसमिती समोर रिलायन्स ४ जी संबंधी कामाची सखोल माहिती, सुनावणी तसेच समितीचा मंजुरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशासनाने सदरील काम सुरु करण्यात येवू नये.असे ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**प्रमोद खेडकर** या ठरावा अन्वये रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. कायम करण्यात आलेल्या उपसमितीचा मंजुरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशासनाने पुढील कामास परवानगी देवू नये असा सर्वसाधारणसभेने निर्णय धेतलेला असतांनाही आयुक्तांनी दि.२७.४.२०१५ रोजी संबंधितांना कामाचे आदेश दिलेले आहे.उपसमितीचा अहवाल प्राप्त झालेला नसतांनाही कामाचे आदेश देण्याची आयुक्तांना एवढी काय घाई होती .अतिरिक्त काम केले म्हणून त्यांना १२,०००/-चा दंड आकारण्यात आलेला आहे.झोन क्र.सी मध्ये ६-७ अनाधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीवरही विना परवानगीने मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले असल्याची

पुराव्यासहित लेखी तक्रार केलेली आहे परंतु त्या विरुध्द कार्यवाही करण्यात येत नाही. गरीबांची घरे मात्र त्वरीत पाडण्यात येतात

**विनय गुर्रम** अनाधिकृत टॉवर विरुध्द कार्यवाही करण्यासाठी वारंवार तक्रार देवूनही सुध्दा त्या विरुध्द कार्यवाही करण्यात येत नाही. प्रत्येक सर्वसाधारण सभेत अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुण्ध्द कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येते.

**प्रमोद खेडकर** रिलायन्सला दि.२७.४.२०१५ ला तातडीने खोदकामाची परवानगी देण्यात आली यामूळे महानगरपालिकेचा काय फायदा झाला याचा खुलासा करण्यात यावा.

**किशोर भवरे** रिलायन्स कंपनीला कैंबल टाकण्यासाठी रस्ते खोदण्याची जी परवानगी देण्यात आली त्याच्या नियम व अटी वाचुन दाखविण्यात याव्यात

**बाळासाहेब तरोडेकर** नांदेड शहरात जवळपास १४१ अनाधिकृत मोबाइल टॉवर उभारण्यात आलेले असून उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर हे अनाधिकृत बांधकाम झालेल्या ईमारतीवर उभारण्यात आलेले आहेत त्या विरुध्द का कार्यवाही करण्यात येत नाही.

**विनय गुर्रम** अनाधिकृत इमारती व मोबाईल टॉवर विरुध्द का कार्यवाही करण्यात येत नाही.

**प्रमोद खेडकर** सर्वसाधारण सभेने पारीत केलेला ठराव क्र.२४५ ची अमलबजवणी का करण्यात येत नाही.सर्वसाधारण सभेच्या ठरावाला महत्व आहे किंवा नाही. सर्वसाधारण सभेच्या ठरावास विचारात न घेता प्रशासन आपल्यास्तरावर कशी काय परवानगी देते.

**अ.सत्तार** सर्वसाधारण सभेने उपसमितीने रिलायन्स 4G ला अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे कामाची चौकशी करण्यासासाठी निर्णय घेतला होता या उपसमितीने आज पर्यत आपला चौकशी अहवाल सर्वसासधारण सभेसमोर का सादर केलेला नाही.उपसमितीने आपला चौकशी अहवाल सर्वसाधारण सभे समोर ठेवावयास पाहिजे होता म्हणजे त्यावर चर्चा करुन निर्णय घेता आला असता

**आयुक्त** उपसमितीचे काम चालू असून उपसमितीचे काम पुर्ण झालेले नाही.

**अ.सत्तार** रिलायन्स 4G ला केबल लाईन टाकण्याकरीता रस्ते खोदण्याची एकाच दिवसात कशी काय परवानगी देण्यात आली.

**आयुक्त** अनाधिकृतपणे उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास संधी देण्यात यावी.संबंधित विभागामार्फत ४-५ महिण्यापासून रिलायन्स 4G ला अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्यासाठी रस्ते खोदण्याची परवानगी देण्याची कार्यवाही चालू आहे. संबंधित विभागाकडून आयुक्तांकडे मान्यतेसाठी/परवानगीसाठी प्रस्ताव आल्यानंतर त्या प्रस्तावावर आयुक्तांनी कीती दिवसात निर्णय घ्यावा याबाबत कायद्यात कोणतीही तरतूद नाही.

**बाळासाहेब तरोडेकर** शहरात १४१ अनाधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले असून किती अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुध्द कार्यवाही करण्यात आली त्यांच्याकडून किती दंड वसुल करण्यात आला त्याची माहिति देण्यात यावी. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली आहे.

**बालाजी कल्याणकर** शहरातील विना परवानगीने उभारलेले सर्व अनाधिकृत मोबाईल टॉवर सिल करण्यात यावे

**महापौर** उपसमितीने आपला अहवाल सर्वसाधारण सभेस सादर करावा त्यावर सभागृह निर्णय घेईल.

**प्रमोद खेडकर** नागरीकाना बांधकाम परवानगीसाठी अर्ज दिल्यानंतर त्यांना नियमानुसार विहित कालावधीत बांधकाम परवानगी देण्यात येत नाही. नागरीक सहा सहा महिणे बांधकाम परवानगीसाठी कार्यालयात चकरा मारुनही त्यांना बाधंकामाची परवानगी देण्यात येत नाही.नागरीक आयुक्त साहेबांना भेटण्यासाठी येतात परंतु त्यांना भेटून देण्यात येत नाही.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** ६-६ महिणे चकरा मारुनही नागरीकांना बांधकाम परवानगी मिळत नसल्याच्या तक्रारी आहे.

**आयुक्त** नागरीकांनी बांधकाम परवानगीसाठी लागणारी आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पुर्तता केली असेल तर त्यांना नियमाप्रमाणे विहित कालावधीत परवानगी देण्यात येते ज्या अर्जासोबत कागदपत्रे नाहीत किंवा अर्जात नकाश्यात काही त्रयुटया असतील तर त्यांना त्याची पुर्तता करण्यासाठी लेखी कळविण्यात येते व त्यांनी पुर्तता केल्यानंतर लगेच बांधकामाची परवानगी देण्यात येते . विनाकारण नागरीकांना कार्यालयात चकरा मारण्याची वेळ येवू देत नाही.माझ्याकडे बांधकाम परवानगीच्या संचिका प्रलंबित राहत नाहीत.प्रशासनावर विश्वास ठेवा.

**विनय गुर्रम** ज्या इमारतीवर मोबाइल टॉवर उभारण्यासाठी परवानगी द्यावयाची आहे त्या इमारतीची पाहणी करुन इमारतीची क्षमता, आजु बाजुच्या इमारती याची तपासणी करुन परवानी देण्यात येते काय इमारतीची शहानिशा होते काय .

**अ.सत्तार** खुदवईनगर भागात अनाधिकृत इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्याची बेकायदेशिर परवानगी देण्यात आली .या सदर्भात मी तक्रार करुन त्यावर कार्यवाही करण्यात येत नाही.

**बाळासाहेब तरोडेकर** इमारतीच्या बांधकामास महानगरपालिकेची परवानगी नसतांना अनाधिकृत इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यात येत आहे त्याविरुध्द कार्यवाही का करण्यात येत नाही.

**रामनारायणजी काबरा** केंद्र शासनाने स्मार्टसिटी मध्ये नांदेड शहराचा समावेश केलेला नाही. स्मार्टसिटीमध्ये आपली महानगरपालिका कुठे कमी पडली आहे याची माहिती देण्यात यावी.

**( श्री रामनारायणजी काबरा यांनी सभागृह सोडले )**

**फारुख अली खा** शहरात जे काही अनाधिकृत मोबाइल टॉवर उभारण्यात आलेले आहे ते काढण्यात यावे. रस्त्यावर बांधकामाचे साहित्य पडल्यामूळे अपघात होत आहे.आमच्या भागात रस्त्यावर पडलेल्या बांधकामाच्या रेतीमूळे एकस मुलाची मोटार सायकल स्लीप होवून अपघातामध्ये त्याचा मृत्यू झालेला आहे. आयुक्त साहेबांनी रस्त्यावर टाकण्यात आलेल्या बांधकामाच्या साहित्यामूळे संबंधित मालकाला रु.१२ हजाराचा दंड आकारला त्याबध्दल मी आयुक्त साहेबांचे तारीफ करतो.

**बाळासाहेब तरोडेकर** माझ्या प्रभागातील विद्यार्थ्याचा वैद्यकिय उपचारा अभावी मृत्यू झालेला आहे.त्याचे काय झालेले आहे.अनाधिकृत मोबाइल टॉवर मध्ये महानगरपालिकेची आर्थिक नुकसान होत आहे त्यावर चर्चा करण्यात यावी.

**आनंद चव्हाण** रिलायन्स ४ जीचा खुलासा करण्यात यावा.

**स. जानी मिया** श्री आनंद चव्हाण व इतर सदस्यांनी यांनी शहरात उभारण्यात आलेल्या अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुध्द कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे.त्यामूळे शहरातील अनाधिकृत मोबाईल विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. वजिराबाद भागातील मस्जीदच्या बाजूला जाहिरात फलक लावणयची परवानगी देण्यात येत आहे ते बरोबर नाही मस्जीद ,मंदिर,कब्रस्थान अशा ठिकाणी जाहिरातीचे फलक लावण्यास परवानगी देण्यात येवू नये असे आमचे मत आहे.

**सुंदरलाल गुरुखूदे** जून्या नांदेड

**आयुक्त** रिलायन्स ४ जी अंतर्गत केबल वायर टाकण्यासाठी रस्ते खोदण्याची जी परवानगी देण्यात आली व मोबाईल टॉवर उभारण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे ते शासन आदेश, न्यायालयाचे आदेश ,महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी यासर्व बाबीचा आदर करुन व महानगरपालिकेची गरज व हित लक्षात घेवून देण्यात आलेली आहे.

नांदेड शहरात जवळपास १३९ मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले असून यापैकी रिलायसन्स कंपनीला २६ व इतर ६ कंपन्यांना टॉवर उभारण्यासाठी एनओसी देण्यात आलेली आहे. शासन निर्देषानूसार विना परवनगीने उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर संबंधित मोबाईल कंपन्यानी एक वर्षाचे आंत नियमित करुन घेणे आवश्यक आहे, त्यामूळे न्यायालयीन आदेश, शासन निर्देष, महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी या सर्व बाबींचा आदर करुन ज्या मोबाईल कंपन्यानी एक वर्षाचे आंत मोबाइल टॉवर नियमित करुन घेतलेले नाही अशा सर्व अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुध्द कार्यवाही येइल. अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुध्द कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास वेळ देण्यात यावा.

**आनंद चव्हाण** दि.३१.३.२०१५ रोजी झालेल्या ठरावाची अमलबजावणी का करण्यात येत नाही. आयुक्तांनी कलम ३२ (१) (इ) नुसार विशेष अधिकाराचा वापर करुन रिलायन्स कंपनीच्या २६ मोबाइल टॉवरला परवानगी दिलेली आहे. मोबाईल टॉवर उभारण्यासाठी एनओसी देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने दि. ४ मार्च २०१४ जे राजपत्र काढलेले आले त्या मध्ये २१ प्रकारच्या अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत. . त्याची पुर्तता न करता उदा. इमारत १५ मिटरपेक्षा उंच असणे ,रोडविथ ,फायर एनओसी, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला,इमारतीचे स्ट्रक्चर तपासण्यात आले नाही विकास खर्च वसुल करण्यात आलेला नाही. ई.बाबी. मोबाइल टावर उभारण्याकरीता एनओसी देण्यात आलेल्या आहे. जे की बेकायदेशिर व महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द आहे त्यामूळे देण्यात आलेल्या परवानग्या रध्द करण्यात याव्यात.

२) जर मोबाइल टॉवर विना परवानगीने उभारण्यात आलेले असतील तर पुणे व इतर महानगरपालिकेने तडजोड शुल्क आकारुन दंड लावून परवानगी अधिकृत केली त्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अमलबजावणी झालेली नाही. यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला रोड खोदण्याची परवानगी देण्यात आली व त्याचे रिस्टोरेशन चार्जेस हे औरंगाबाद महानगरपालिकेच्या धर्तीवर वसुल करण्यात आले परंतु पुणे व इतर महागनरपालिकेच्या धर्तीवर वसुंल केले असते तर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते.

४) परवानगी दिल्यापेक्षा जास्त खोदकाम झालेले आहे जास्तीचे झालेले खोदकामावर दंड लावून ते संबधित कंपनीकडून वसुल करावयास पाहिजे होते.ते करण्यात आलेले नाही.

५) दि.३१.३.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यावर सुध्दा सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची दखल न घेता रिलायन्स कंपनीला केंबर टाकण्यासाठी दि.२७.४.२०१५ ला रस्ता खोदकामाची परवानगी देण्यात आली ही आयुक्तांची मनमानी आहे.जेव्हा की आयुक्त सर्वसाधारण सभा मोठी असल्याचे सांगतात.रिलायसन्स कंपनीला मोबाईल टॉवर उभारण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे ते शासन राजपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची याची सखोंल चौकशी करण्यासाठी डायरेक्टर ऑफ टावुन प्लॅनिग पुणे यांच्याकडे शिफारस करण्यात यावी.

**अ.सत्तार** — श्री आनंद चव्हाण यांनी शिफारस केल्याप्रमाणे डायरेक्टर ऑफ टावुन प्लॅनिग, पुणे यांचेकडे सखोल चौकशी करण्यासाठी शिफारस करण्यास काय अडचण आहे. शिफारस करण्यात यावी. .

**महापौर** — स.सदस्यानी ४ जी अंतर्गत रिलायसन्स कंपनीला केंबल टाकण्यासाठी रस्ते खोदण्यासाठी व अनाधिकृत मोबाइल टॉवरची चौकशी डायरेक्टर ऑफ टावुन प्लॅनिग, पुणे यांचेकडून करण्यासाठीचा लेखी प्रस्ताव द्यावा त्यावर प्रशासकीय अभिप्राय मागवुन सभागृहास निर्णय घेता येईल.

**बाळासाहेब तरोडेकर** — शहरात गोहत्या बंदी असतांनाही राजरोजसपणे शहरात मोठया प्रमाणात गोहत्या होत असून महानगरपालिका त्यांच्या विरुध्द काहीच कार्यवाही करीत नाही. संबंधितावर गुन्हे नोंदविण्यात यावे.

**बालाजी कल्याणकर** — संबंधित अधिका-याविरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**अ.सत्तार** — स.सदस्य वादातीत प्रश्न उपस्थित करुन सभागृहात गोंधळ निर्माण करीत असल्यामूळे अशा सदस्यांना निलंबित करण्यात यावे.

**स.शेर अली** — स.सदस्य सभागृहाची दिशाभूल करीत आहेत त्यांना निलंबित करण्यात यावे.

( बहुसंख्य नगरसेवक महापौरांच्या दालनासमोर येवून मोठयाने घोषणाबाजी करु लागल्यामूळे व आपसात एकमेकांना धक्काबुक्की करु लागल्यामूळे सभागृहात मोठया प्रमाणात गोंधळ निर्माण झाला कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.)

**महापौर** — स.सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे व शांततेने सभेचे कामकाजात भाग घ्यावा विनाकारण सभागृहात गोंधळ निर्माण करुन सभेच्या कामकाजात अडथळा आणू नये.सभागृहाचे कामाकाजास सहकार्य करावे असे मी सर्व स.सदस्यांना आवाहन करीत आहे.

यानंतरही सभागृहात गोंधळ वाढतच गेला.गडबळ गोंधळ घालणारे सदस्यांनी महापौरांचे आवाहन प्रतिसाद दिला नाही.

**सरजितसिंघ गिल** — महापौरांनी स.सदस्यांना आपल्या आसनावर बसण्याचे आवाहन करुनही विषयावर चर्चा न करता ते गोंधळ घालीत आहेत त्यामूळे मूळ विषयपत्रिकेवरील विषय क्र.१४ हा नामंजुर करण्यात यावा तसेच विषय क्र.१५ वर निर्णय घेण्याचे अधिकार महापौरांना देण्यात यावे.मुळ विषयपत्रिकेवरील प्रशासनाच्या विषयास मान्यता देण्यात यावी व स.सदस्यांच्या प्रस्तावास प्रशासकीय टिप्पणी नूसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी व या सर्व ठरावाना याच सभेत कायम करण्यात यावे.

**अ.सत्तार** — श्री सरजितसिंध गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे मुळ विषय पत्रीकेवरील व पुरवणी विषय पत्रिकेवरील विषयांना मान्यता देण्यात यावी. श्री सरजितसिंघ गिल यांच्या प्रस्तावास बहसंख्य स.सदस्यांनी एकाच वेळी पास म्हणून मान्यता दिली.

**महापौर** — विरोधी पक्षाच्या स.सदस्यांना वारंवार सभेचे काम शांततेने पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करुनही ते सभागृहात विनाकारण गोंधळ निर्माण करुन सभेच्या कामकाजात अडथळे निर्माण करीत असल्यामूळे श्री सरजितसिंघ गिल यांच्या प्रस्तावाप्रमाणे मुळ विषय पत्रिकेवरील विषय क्र.१४ हा नामंजुर करुन मुळ विषयपत्रिके वरील व पुरवणी विषय पत्रिकेवरील प्रशासनाच्या विषयास मान्यता देण्यात येते व स.सदस्यांच्या प्रस्तावावर आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. मुळ विषय पत्रिकेवरील विषय क्र. १२ व पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र. २० वर एकत्रित निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म पुरुष | स्त्री | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |

**महापौर** — नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.२०** **ठराव**

खालील प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा घेते. .

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म पुरुष | स्त्री | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |

**विषय क्र.२**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/३५९४/२०१५ दि.१६ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपा कर्मचा-यांना दि.१.२.२०१५ पासून १०७ टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यामूळे महानगरपालिकेतील सर्व कर्मचा-यांना दि.१ जूलै २०१४ ते दि.३१ जानेवारी २०१५ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा देते.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.२१** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/३५९४/२०१५ दि.१६ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपा कर्मचा-यांना दि.१.२.२०१५ पासून १०७ टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यामूळे महानगरपालिकेतील सर्व कर्मचा-यांना दि.१ जूलै २०१४ ते दि.३१ जानेवारी २०१५ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा देते

**विषय क्र.३**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/३०१६/२०१५ दि.३ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपाकेतील निवृती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनधारक याचे वेतनावर दि.१.२.२०१५ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर १०० टक्के वरुन १०७ टक्के करण्यात आला असून त्यानुसार दि.१ फेबुवारी २०१५ पासून सदर महागाई भत्ता वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्यात येत आहे.तसेच दि.१जूलै २०१५ ते ३१ जानेवारी २०१५ या कालावधीतील महागाई वाढीची थकीत रक्कम १०७ टक्के दराने रोखीने प्रदान करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.२२** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/३०१६/२०१५ दि.३ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपाकेतील निवृती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनधारक याचे वेतनावर दि.१.२.२०१५ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर १०० टक्के वरुन १०७ टक्के करण्यात आला असून त्यानुसार दि.१ फेबुवारी २०१५ पासून सदर महागाई भत्ता वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्यात येत आहे.तसेच दि.१जूलै २०१५ ते ३१ जानेवारी २०१५ या कालावधीतील महागाई वाढीची थकीत रक्कम १०७ टक्के दराने रोखीने प्रदान करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा देते

**विषय क्र.४**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/४२८४/२०१५ दि.१ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपाकेतील २२८ कर्मचा-यांना प्रत्येकी रु.५०००/" एकूण रक्कम रु.११,४०,०००/- रमजान सणा निमित्य अग्रीम रक्कम मंजुर करुन संबंधिताच्या वेतनातून रु.५००/- समान १० हस्यात वसुल करुन मनपा फंडात जमा करण्यासाठी मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.२३** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/४२८४/२०१५ दि.१ जून २०१५ अन्वये शासन निर्णयानुसार नांवामनपाकेतील २२८ कर्मचा-यांना प्रत्येकी रु.५०००/" एकूण रक्कम रु.११,४०,०००/- रमजान सणा निमित्य अग्रीम रक्कम मंजुर करुन संबंधिताच्या वेतनातून रु.५००/- समान १० हस्यात वसुल करुन मनपा फंडात जमा करण्यासाठी मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा देते

**विषय क्र.५**

नावामनपाकेच्या प्राथमिक शाळेस जोडून मिनी बालवाडया सुरु करण्यासाठी मराठी माघ्यमाच्या ९ बालवाडयासाठी बालकताई व उर्दू माध्यमाच्या ९ बालवाडयासाठी बालकताई असे एकूण १८ बालवाडयावर १८ बालकताईची १० महिण्याकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित प्रतीमाह रु.३०००/- प्रमाणे नियुक्ती करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१४७ दि.२४.११.२०१४ अन्वये मान्यता दिलेले असून सदरील पदासाठी शैक्षणिक अर्हता नमूद नसल्यामूळे त्या ठरावात अंशत: दुरुस्ती करुन उक्त पदासाठी शैक्षणिक अर्हता १० वी उत्तीर्ण व व्यावसायीक पात्रता (मॉन्टेन्सरी कोर्स उत्तीर्ण) असलेल्या उमेदवारास नियुक्ती करण्यासाठी तसेच सदरील मानधनावर होणारा खर्च मनपा फंडातून करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**नगरसचिव** प्रशासनाने आपला प्रस्ताव परत घेतलेला आहे.

**महापौर** प्रशासनाने आपला प्रस्ताव परत घेतलेला असल्यामूळे प्रस्ताव विषयपत्रिकेतून वगळण्यात येतो.

**विषय क्र.६**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रशासनात गतिमानता, पारदर्शकता व लोकाभिमुख सेवा मध्ये लक्षणिय सुधारणा घडवून आण्यासाठी मनपाकेच्या विविध संवर्गातील पदनिर्मीती बाबत महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.एनव्हीसी-302002/1350/प्र.क्रं.157/03 नवि-22 दि. 17 ऑगस्ट 2004 अन्वये दिलेल्या पदनिर्मीतीच्या आदेशात महापालिकेकडून यापुढे हाती घेण्यात येणारी बहुतांश कामे कायम/तात्पुरते तत्वावर कर्मचारी नियुक्त न करता कंत्राटी तत्वावर घेण्यात यावे व काम संपल्यानंतर कंत्राटी सेवा संपुष्ठात आणण्यात याव्यात असे नमुद आहे. ही बाब विचारात घेवून जेएनएनयुआरम हे कार्यक्रम संपेपर्यंत किंवा पुढील दोन वर्षे यापैकी जो कमी असेल त्या कालावधीकरता डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाची आवश्यकता विचारात घेवून प्रतिमहा एकत्रीत वेतन रु.6000/- वर विहित पध्दतीचा अवलंब करून 25 डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे भरण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 137 दि.30.10.2010 अन्वये दोन वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती.

त्यानुसार विहित पध्दतीचा अवलंब करून 25 डाटा एन्ट्री ऑपरेटरची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर प्रतिमहा एकत्रीत वेतन रु. 6000/- व दोन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुका करण्यात आल्या होत्या. सदरचा कालावधी दि.30.10.2012 रोजी संपला आहे. तदनंतर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्रं. 10 दि.02.04.2013 अन्वये उक्त डाटा एन्ट्री ऑपरेटरची विविध विभागात कामे चालू असल्यामुळे कामाचा वाढता व्याप व अपुरा संगणकीय कर्मचारी वर्ग इत्यादी बाबी लक्षात घेवून जेएनएनयुआरएम किंवा पुढील दोन वर्षे यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी दर सहा महिन्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून पुर्वीच्याच अटी व शर्थीवर कार्यरत असलेल्या कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना प्रतिमहा एकत्रीत वेतन रु. 6000/- या प्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार दर सहा महिन्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्रं.नांवाशमनपा/आस्था-सेल/17838/14 दि.30.12.2014 अन्वये देण्यात आलेली मुदत वाढ 29.06.2015 रोजी संपली आसल्यामुळे पुढील मुदतवाढ देणे बाबत सध्या कार्यरत असलेल्या 9 कंत्राटी डाटा एन्टी ऑपरेटर यांचे काम समाधान कारक आहे किंवा कसे ? तसेच त्यांच्या सेवेची मनपास आवश्यकता आहे किवा कसे या बाबत संबंधीत विभाग प्रमुखांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

संबंधीत विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार सध्या कार्यरत असलेल्या 9 कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटरांचे काम समाधानकारक असून त्यांच्या सेवेची मनपास आवश्यकता आहे. तसेच संबंधीतांच्या सेवेची मुदत दि. 29.06.2015 रोजी संपली असल्यामुळे संबंधीताच्या सेवेस दि. 30.06.2015 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून दि.01.07.2015 ते 30.12.2015 पर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने दरमहा एकत्रीत वेतन रु. 6,000/- एवढया वेतनावर सेवेस मुदतवाढ देण्याबातचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारणसभे समोर मान्यतेस्तव ठेवण्यात यावा. सोबत यादी जोडली आहे.

सध्या कार्यरत असलेले कंत्राटी डाटा एंन्टी ऑपरेटर खालीलप्रमाणे आहे.

| अक्रं | कंत्राटी डाटा एंन्टी ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग |
|---|---|---|
| 1 | असदुल्लाखान अजिमुल्लाखान | नगररचना विभाग |
| 2 | अरकुले श्यामसुदर गुलाबराव | क्षे.का.क्रं. B |
| 3 | दुथडे किशोर पांडुरंग | क्षे.का.क्रं. C |
| 4 | श्रीकांत वसंतराव अजनसोंडकर | भुसंपादन विभाग |
| 5 | कोकणे सिध्दार्थ खंडेराव | स्थानिक संस्था कर विभाग |
| 6 | नागुल महेश नरसय्या | संगणक विभाग |
| 7 | गुलाम रसुल गुलाम मोहमद | आपत्ती व्यवस्थापन कक्ष |
| 8 | जोंधळे विजयमाला विठ्ठलराव | क्षे.का.क्रं. B |
| 9 | मंजु गिरधारीलाल व्यास | भुसंपादन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, |

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रशासनात गतिमानता,पारदर्शकता व लोकाभिमुख सेवा मध्ये लक्षणिय सुधारणा घडवून आण्यासाठी मनपाकेच्या विविध संवर्गातील पदनिर्मीती बाबत महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.एनव्हीसी-302002/1350/प्र.क्रं.157/03 नवि-22 दि. 17 ऑगस्ट 2004 अन्वये दिलेल्या पदनिर्मीतीच्या आदेशात महापालिकेकडून यापुढे हाती घेण्यात येणारी बहुतांश कामे कायम/तात्पुरते तत्वावर कर्मचारी नियुक्त न करता कंत्राटी तत्वावर घेण्यात यावे व काम संपल्यानंतर कंत्राटी सेवा संपुष्ठात आणण्यात याव्यात असे नमुद आहे. ही बाब विचारात घेवून जेएनएनयुआरम हे कार्यक्रम संपेपर्यंत किंवा पुढील दोन वर्षे यापैकी जो कमी असेल त्या कालावधीकरता डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाची आवश्यकता विचारात घेवून प्रतिमहा एकत्रीत वेतन रु.6000/- वर विहित पध्दतीचा अवलंब करून 25 डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे भरण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 137 दि.30.10.2010 अन्वये दोन वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती.

त्यानुसार विहित पध्दतीचा अवलंब करून 25 डाटा एन्ट्री ऑपरेटरची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर प्रतिमहा एकत्रीत वेतन रु. 6000/- व दोन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुका करण्यात आल्या होत्या. सदरचा कालावधी दि.30.10.2012 रोजी संपला आहे.

तदनंतर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्रं. 10 दि.02.04.2013 अन्वये उक्त डाटा एन्ट्री ऑपरेटरची विविध विभागात कामे चालू असल्यामुळे कामाचा वाढता व्याप व अपुरा संगणकीय कर्मचारी वर्ग इत्यादी बाबी लक्षात घेवून जेएनएनयुआरएम किंवा पुढील दोन वर्षे यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी दर सहा महिन्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून पुर्वीच्याच अटी व शर्थीवर कार्यरत असलेल्या कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना प्रतिमहा एकत्रीत वेतन रु. 6000/- या प्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार दर सहा महिन्याला एक-एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्रं.नांवाशमनपा/आस्था-सेल/17838/14 दि.30.12.2014 अन्वये देण्यात आलेली मुदत वाढ 29.06.2015 रोजी संपली आसल्यामुळे पुढील मुदतवाढ देणे बाबत सध्या कार्यरत असलेल्या 9 कंत्राटी डाटा एन्टी ऑपरेटर यांचे काम समाधान कारक आहे किंवा कसे ? तसेच त्यांच्या सेवेची मनपास आवश्यकता आहे किवा कसे या बाबत संबंधीत विभाग प्रमुखांचा अहवाल मागविण्यात आला आहे.संबंधीत विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार सध्या कार्यरत असलेल्या खालील 9 कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटरांचे काम समाधानकारक असून त्यांच्या सेवेची मनपास आवश्यकता आहे. तसेच संबंधीतांच्या सेवेची मुदत दि. 29.06.2015 रोजी संपली असल्यामुळे संबंधीताच्या सेवेस दि. 30.06.2015 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून दि.01.07.2015 ते 30.12.2015 पर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने दरमहा एकत्रीत वेतन रु. 6,000/- एवढया वेतनावर सेवेस मुदतवाढ ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अक्रं | कंत्राटी डाटा एंन्टी ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग |
|---|---|---|
| 1 | असदुल्लाखान अजिमुल्लाखान | नगररचना विभाग |
| 2 | अरकुले श्यामसुदर गुलाबराव | क्षे.का.क्रं. B |
| 3 | दुथडे किशोर पांडुरंग | क्षे.का.क्रं. C |
| 4 | श्रीकांत वसंतराव अजनसोंडकर | भुसंपादन विभाग |
| 5 | कोकणे सिध्दार्थ खंडेराव | स्थानिक संस्था कर विभाग |
| 6 | नागुल महेश नरसय्या | संगणक विभाग |
| 7 | गुलाम रसुल गुलाम मोहमद | आपत्ती व्यवस्थापन कक्ष |
| 8 | जोंधळे विजयमाला विठ्ठलराव | क्षे.का.क्रं. B |
| 9 | मंजु गिरधारीलाल व्यास | भुसंपादन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, |

**विषय क्र.७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 9 कंत्राटी वैद्यकिय/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी यांची मुदतवाढ देण्यासाठी मनपा सर्व साधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला असता मनपा सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 146 दिनांक 09.01.2015 रोजीच्या ठरावात खालील 4 कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी यांची मुदत दिनांक 31.03.2015 रोजी संपत असल्यामुळे त्यांची मुदत संपत असल्यामुळे त्याना एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुढील सहा महिण्याकरिता मुदतवाढीचा नव्याने प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर ठेवण्यात याचा असा ठराव पारीत करण्यात आलेला असल्यामुळे त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील आरसीएच योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या एकूण 04 स्त्री वैद्यकिय अधिकारी महानगरपालिकेस आवश्यकता व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी यांना मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 49 दिनांक 19.07.2014 अन्वये दर महा एकत्रीत वेतन रुपये 25,000/- दरमहा देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/14402/14 दिनांक 10.11.2014 अन्वये लागु करण्यात आलेला आहे. खालील स्त्री वैद्यकिय अधिका-यांनाही एकच तारीख ठेवणे आवश्यक असल्यामुळे संबंधीतांच्या नावा समोर देर्शविल्यानुसार त्यांचे मुदतवाढीचे तारखेस दुरुस्ती करून मुदतवाढीची एकच तारखे ठेवणे आवश्यक आहेत.

| अ. क्र. | कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांचे नांव | पद | मुदतवाढ संपल्याची तारीख | तांत्रीक खंड दिनांक | पुढील मुदतवाढीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. प्रांजली पंकजराव जोशी | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |
| 2 | डॉ. स्मिता गोविंदराव भट्टड | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |
| 4 | डॉ. मुजफर अमीना बेगम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |

करिता वरील कार्यरत असलेल्या आरसीएच योजने अंतर्गत कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी-4 यांना एकत्रीत वेतन रुपये 25,000/- वर वरील प्रमाणे मुदतवाढ देवुन नियमीत एक एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्व साधारण सभे समोर मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 9 कंत्राटी वैद्यकिय/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी यांची मुदतवाढ देण्यासाठी मनपा सर्व साधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला असता मनपा सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 146 दिनांक 09.01.2015 रोजीच्या ठरावात खालील 4 कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी यांची मुदत दिनांक 31.03.2015 रोजी संपत असल्यामुळे त्यांची मुदत संपत असल्यामुळे त्याना एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुढील सहा महिण्याकरिता मुदतवाढीचा नव्याने प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर ठेवण्यात याचा असा ठराव पारीत करण्यात आलेला असल्यामुळे त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील आरसीएच योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या एकूण 04 स्त्री वैद्यकिय अधिकारी महानगरपालिकेस आवश्यकता व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी यांना मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 49 दिनांक 19.07.2014 अन्वये दर महा एकत्रीत वेतन रुपये 25,000/- दरमहा देण्यास मान्यता प्रदान केल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/14402/14 दिनांक 10.11.2014 अन्वये लागु करण्यात आलेला आहे. खालील स्त्री वैद्यकिय अधिका-यांनाही एकच तारीख ठेवणे आवश्यक असल्यामुळे संबंधीतांच्या नावा समोर देर्शविल्यानुसार त्यांचे मुदतवाढीचे तारखेस दुरुस्ती करुन मुदतवाढीची एकच तारखे ठेवणे आवश्यक आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांचे नांव | पद | मुदतवाढ संपल्याची तारीख | तांत्रीक खंड दिनांक | पुढील मुदतवाढीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. प्रांजली पंकजराव जोशी | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |
| 2 | डॉ. स्मिता गोविंदराव भट्टड | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |
| 3 | डॉ. पल्लवी राजेंद्र तुंगेनवार | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |
| 4 | डॉ. मुजफर अमीना बेगम | कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी | 31.03.2015 | 01.04.2015 व 30.06.2015 | 02.04.15 ते 29.06.15 व 01.07.15 ते 30.12.15 पर्यंत |

करिता वरील कार्यरत असलेल्या आरसीएच योजने अंतर्गत कंत्राटी स्त्री वैद्यकिय अधिकारी-4 यांना एकत्रीत वेतन रुपये 25,000/- वर वरील प्रमाणे मुदतवाढ देवुन नियमीत एक एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 05 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकीय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV सुपरवायझर-1 असे एकूण 6 कर्मचारी कार्यरत असून त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असून व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये 25,000/- वर त्यांच्या नावासमोर दिर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/3091/2015 दिनांक 04 जून, 2015 खालील अधिका-यांची सहा महिण्याची मुदत दिनांक 29.06.2015 रोजी संपत असल्यामुळे संबंधीताच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक 30.06.2015 च्या त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन

दि.01.07.2015 ते दि.30.12.2015 पर्यंत मुदतवाढ देणेच्या मान्यता देवून नियमीत एक-एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

| अ. क्र. | कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांचे नांव | पद | एकत्रित वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ.राफे अ.खदीर | कंत्राटी वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 2 | डॉ.अन्सारी मो.राफे मो. इस्माईल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 3 | डॉ.रिजवान अहेमद गुलाम रसुल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 4 | डॉ.श्रुती रविंद्र कोटलवार | कंत्राटी महिला वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 5 | डॉ.विजया परसुराम राठोड | कंत्राटी महिला वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 6 | श्री सोळंके राम मारोतराव | कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV सुपरवायझर | 15,000/- | 30.06.2015 |

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 05 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकीय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV सुपरवायझर-1 असे एकूण 6 कर्मचारी कार्यरत असून त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता असून व संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचे प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामुळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना दरमहा एकत्रीत वेतन रुपये 25,000/- वर त्यांच्या नावासमोर दिर्शविलेल्या कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/3091/2015 दिनांक 04 जून, 2015 खालील अधिका-यांची सहा महिण्याची मुदत दिनांक 29.06.2015 रोजी संपत असल्यामुळे संबंधीताच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक 30.06.2015 च्या त्यांच्या सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.01.07.2015 ते दि.30.12.2015 पर्यंत मुदतवाढ देणेच्या मान्यता देवून नियमीत एक-एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देणे बाबतचे प्रस्तावास ही नांवाशमना मनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ. क्र. | कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांचे नांव | पद | एकत्रित वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ.राफे अ.खदीर | कंत्राटी वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 2 | डॉ.अन्सारी मो.राफे मो. इस्माईल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 3 | डॉ.रिजवान अहेमद गुलाम रसुल | कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 4 | डॉ.श्रुती रविंद्र कोटलवार | कंत्राटी महिला वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 5 | डॉ.विजया परसुराम राठोड | कंत्राटी महिला वैद्यकीय अधिकारी | 25,000/- | 30.06.2015 |
| 6 | श्री सोळंके राम मारोतराव | कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV सुपरवायझर | 15,000/- | 30.06.2015 |

**विषय क्र.९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर श्री व्ही.जी.झंवर, सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांची कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/737/10 दि.22.04.2010 अन्वये प्रतिमहा पारिश्रामीकावर प्रथम सहा महिण्यांकरिता मनपाकेतील पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील JNNURM अंतर्गत कामाचा निपटारा करण्यासाठी विशेष कार्याधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. तदनंतर संबंधितास मनपा सर्व साधारण सभेच्या मान्यतेनुसार वेळोवेळी प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवेत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

यापुर्वी संबंधितांच्या प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवा कालावधीची मुदत दिनांक 03.05.2014 रोजी संपलेली असल्याने महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं.153 दि.25.11.2013 च्या अनुषंगाने मा.महापौर यांनी संबंधितांच्या सेवेत मुदतवाढ देण्यास दि.20.02.2014 रोजीच्या पत्राद्वारे मान्यता दिल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/5236/14 दिनांक 13.06.2014 अन्वये त्यांचे सेवेत दिनांक 04.05.2014 रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक 05.05.2014 पासुन पुढील एका वर्षाकरीता म्हणजे दिनांक 04.05.2015 रोजी पर्यंत कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/4647/10 दि.08.09.2010 अन्वये ठरविण्यात आलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ सेवेत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संबंधितांच्या सेवा कालावधीची मुदत दिनांक 04.05.2015 रोजी संपलेली असुन संबंधितास मनपा क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनेचा तांत्रिक ज्ञान व अनुभव विचारात घेता त्यांची सेवेची महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने त्यांचे सेवेत दिनांक 05.05.2015 रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक 06.05.2015 पासुन पुढील सहा महिण्यांकरीता म्हणजे दि.05.11.2015 पर्यंत यापुर्वी दिनांक 08.09.2010 रोजीच्या आदेशान्वये ठरविलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यास महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. २७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर श्री व्ही.जी.झंवर, सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांची कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/737/10 दि.22.04.2010 अन्वये प्रतिमहा पारिश्रामीकावर प्रथम सहा महिण्यांकरिता मनपाकेतील पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील JNNURM अंतर्गत कामाचा निपटारा करण्यासाठी विशेष कार्याधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. तदनंतर संबंधितास मनपा सर्व साधारण सभेच्या मान्यतेनुसार वेळोवेळी प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवेत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

यापुर्वी संबंधितांच्या प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवा कालावधीची मुदत दिनांक 03.05.2014 रोजी संपलेली असल्याने महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं.153 दि.25.11.2013 च्या अनुषंगाने मा.महापौर यांनी संबंधितांच्या सेवेत मुदतवाढ देण्यास दि.20.02.2014 रोजीच्या पत्राद्वारे मान्यता दिल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/5236/14 दिनांक 13.06.2014 अन्वये त्यांचे सेवेत दिनांक 04.05.2014 रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक 05.05.2014 पासुन पुढील एका वर्षाकरीता म्हणजे दिनांक 04.05.2015 रोजी पर्यंत कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/4647/10 दि.08.09.2010 अन्वये ठरविण्यात आलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ सेवेत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संबंधितांच्या सेवा कालावधीची मुदत दिनांक 04.05.2015 रोजी संपलेली असुन संबंधितास मनपा क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनेचा तांत्रिक ज्ञान व अनुभव विचारात घेता त्यांची सेवेची महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने त्यांचे सेवेत दिनांक 05.05.2015 रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दिनांक 06.05.2015 पासुन पुढील सहा महिण्यांकरीता म्हणजे दिनांक 05.11.2015 पर्यंत यापुर्वी दिनांक 08.09.2010 रोजीच्या आदेशान्वये ठरविलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१०**

श्री माधव शंकर बाशेट्टी, शहर अभियंता नांवाशमनपा नांदेड यांना सेवेत पुन:स्थापित केलेला कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/१३०३/२०१५ दिनांक २९.०४.२०१५ हा आदेश उक्त शासन निर्णय दिनांक १६ जुलै २०१५ अन्वये

अधिक्रमित करुन त्यांचे दिनांक २८.१०.२०१४ रोजीचे आदेशान्वये केलेले निलंबन पुढील आदेशापर्यंत आदेश क्र. क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/५२३८/२०१५ दिनांक २०.०७.२०१५ व्दारे कायम करण्यात आले त्याची नोंद घेणे.

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.२८** **ठराव**

श्री माधव शंकर बाशेट्टी, शहर अभियंता नांवाशमनपा नांदेड यांना सेवेत पुन:स्थापित केलेला कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/१३०३/२०१५ दिनांक २९.०४.२०१५ हा आदेश उक्त शासन निर्णय दिनांक १६ जुलै २०१५ अन्वये अधिक्रमित करुन त्यांचे दिनांक २८.१०.२०१४ रोजीचे आदेशान्वये केलेले निलंबन पुढील आदेशापर्यंत आदेश क्र. क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/५२३८/२०१५ दिनांक २०.०७.२०१५ व्दारे कायम करण्यात आले त्याची नोंद ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा घेते.

**विषय क्र.११**

**विषय** :- अखिल भारतीय अंध/अपंग कवी संमेलनासाठी आर्थिक अनुदान देणे बाबत.

**संदर्भ** :- 1) श्री बी.डी.शिंदे, सचिव, राष्ट्रीय संघटन-विकलांगाच्या विकासासाठी समर्पित- सक्षम देवगिरी प्रांत नांदेड यांचे पत्र दि.24.02.2015

2) श्रीराम गुप्ता राष्ट्रीय महामंत्री सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंध मंडळ, केंद्रीय कार्यालय 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर २ यांचे पत्र दि.15.06.2015

सचिव ,सक्षम समदृष्टी क्षमता विकास अनुसंधान एवम मंडळ विकलांग सेवाहेतू आर्थ राष्ट्रीय संघटन व मराठवाडा असोसिएशन ऑफ दी ब्लाईंड नांदेड यांनी यावर्षी संत सुरदास जयंती निमित्त अखिल भारतीय अंध अपंगाचे दोन दिवशीय हिंदी-मराठी कवी संमेलन नांदेड नगरीत महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित करावयाचे योजिले असून त्यासाठी महानगरपालिकेच्या अंध अपंगांसाठी ३% आर्थिक तरतुदी मधून खर्च करण्यात यावा व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने कवी संमेलनाचे आयोजन व्हावे ,अशी विनंती केलेली आहे.
संबंधितांनी सक्षम विकलांगाच्या विकासासाठी समर्पित अखिल भारतीय संस्था संपूर्ण भारतातील 31 राज्यामध्ये काम करत असून या संस्थेच्या संलग्न सक्षम, देवगिरी प्रांत, नांदेड यांची शाखा असून नांदेड क्षेत्रात सालसन 2008 पासून कार्य करत आहे.

सक्षम संस्थेच्या स्थापनेच्या दिवसानिमित्त दि.20 व 21 जुन 2015 रोजी सदर संस्थेमार्फत अंध अपंग साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून, सदर कार्यक्रमासाठी जवळपास 3.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे अनुदान देण्याचे नमुद केले आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केलेली आहेत.

1) समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर बॅलन्स सिट 31 मार्च 2013
2) INCOME ESPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 31ST MARCH 2013
3) RECEIPTS & PAYMENT ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31ST MARCH 2013
4) INDIAN INCOME TAX RETURN ACKNOWLEDGEMENT ASSESMENT YEAR 2013-14
5) INDIAN INCOME TAX RETURN ACKNOWLEDGEMENT ASSESMENT YEAR 2014-15

6) INCOME ESPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 31ST MARCH 2014

7) RECEIPTS & PAYMENT ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31ST MARCH 2014

8) Charted accuntants adiut reports

9) समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर, यांचे नोदणी प्रमाणपत्र

उपरोक्त प्रमाणे कागदपत्र समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर यांच्या नावाचे आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे कलम 66 (21), (22), (25), (26) व (41) अन्वये सांस्कृतीक कार्यक्रम/क्रिडा/महिला बालकल्याण व संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली मनपाने तयार केलेली आहे. ज्यामध्ये अनुदान वाटपाची कार्यपध्दती कलम 3 नियम 8 मध्ये पंजीकृत संस्था यांचे पंजीकरण करुन 5 वर्षाचा कालावधी झालेला असला पाहिजे व महानगरपालिका हद्दीत कमीत कमी 5 वर्षाचे कार्य असले पाहिजे तरच अनुदान देण्यात येईल अशी स्पष्ट तरतुद आहे.

तथापि सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ, केंद्रीय कार्यालय ड़ 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर यांच्याशी सक्षम देवगिरी प्रांत नांदेड हि संस्था संलग्न असुन, महानगरपालिका क्षेत्रात सालसन 2008 पासुन काम करित आहे.सक्षम देवगिरी प्रांत नांदेड या संस्थेने अंध व अपंग कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित केलेला असल्यामुळे व सदर संस्था सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ, केंद्रीय कार्यालय - 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर यांच्या अधिपत्याखाली काम करित असल्याने वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्र सादर करणा-या पंजीकृत संस्थेच्या नावे अनुदान देणे व त्यांच्यामार्फत सक्षम देवगिरी प्रांत नांदेड यांना अनुदान वितरीत करणे क्रमप्राप्त आहे.

करिता उपरोक्त अटीच्या व नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा /साप्रवि/ ३८१०/२०१५ दि.२० जून २०१५ अन्वये वरील कार्यक्रमासाठी रु.1,00,000/- (अक्षरी रुपये लक्ष फक्त/-) चे अनुदान देण्याची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.२९** **ठराव**

**विषय** :- अखिल भारतीय अंध/अपंग कवी संमेलनासाठी आर्थिक अनुदान देणे बाबत.

**संदर्भ** :- 1) श्री बी.डी.शिंदे, सचिव, राष्ट्रीय संघटन-विकलांगाच्या विकासासाठी समर्पित- सक्षम देवगिरी प्रांत नांदेड यांचे पत्र दि.24.02.2015

2) श्रीराम गुप्ता राष्ट्रीय महामंत्री सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंध मंडळ, केंद्रीय कार्यालय 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर २ यांचे पत्र दि.15.06.2015

सचिव ,सक्षम समदृष्टी क्षमता विकास अनुसंधान एवम मंडळ विकलांग सेवाहेतू आर्थ राष्ट्रीय संघटन व मराठवाडा असोसिएशन ऑफ दी ब्लाईंड नांदेड यांनी यावर्षी संत सुरदास जयंती निमित्त अखिल भारतीय अंध अपंगाचे दोन दिवशीय हिंदी-मराठी कवी संमेलन नांदेड नगरीत महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित करावयाचे योजिले असून त्यासाठी महानगरपालिकेच्या अंध अपंगांसाठी ३% आर्थिक तरतुदी मधून खर्च करण्यात यावा व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने कवी संमेलनाचे आयोजन व्हावे ,अशी विनंती केलेली आहे. संबंधितांनी सक्षम विकलांगाच्या विकासासाठी समर्पित अखिल भारतीय संस्था संपूर्ण भारतातील 31 राज्यामध्ये काम करत असून या संस्थेच्या संलग्न सक्षम, देवगिरी प्रांत, नांदेड यांची शाखा असून नांदेड क्षेत्रात सालसन 2008 पासून कार्य करत आहे.

सक्षम संस्थेच्या स्थापनेच्या दिवसानिमित्त दि.20 व 21 जुन 2015 रोजी सदर संस्थेमार्फत अंध अपंग साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून, सदर कार्यक्रमासाठी जवळपास 3.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे अनुदान देण्याचे नमुद केले आहे. सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केलेली आहेत.

1) समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर बॅलन्स सिट 31 मार्च 2013

2) INCOME ESPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 31ST MARCH 2013

3) RECEIPTS & PAYMENT ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31ST MARCH 2013

4) INDIAN INCOME TAX RETURN ACKNOWLEDGEMENT ASSESMENT YEAR 2013-14

5) INDIAN INCOME TAX RETURN ACKNOWLEDGEMENT ASSESMENT YEAR 2014-15

6) INCOME ESPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 31ST MARCH 2014

7) RECEIPTS & PAYMENT ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31ST MARCH 2014

8) Charted accuntants adiut reports

9) समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर, यांचे नोदणी प्रमाणपत्र

उपरोक्त प्रमाणे कागदपत्र समदृष्टी क्षमता विकास एंव अनुसंधान मंडळ नागपुर यांच्या नावाचे आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे कलम 66 (21), (22), (25), (26) व (41) अन्वये सांस्कृतीक कार्यक्रम/क्रिडा/महिला बालकल्याण व संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली मनपाने तयार केलेली आहे. ज्यामध्ये अनुदान

वाटपाची कार्यपध्दती कलम 3 नियम 8 मध्ये पंजीकृत संस्था यांचे पंजीकरण करुन 5 वर्षाचा कालावधी झालेला असला पाहिजे व महानगरपालिका हद्दीत कमीत कमी 5 वर्षाचे कार्य असले पाहिजे तरच अनुदान देण्यात येईल अशी स्पष्ट तरतुद आहे.

तथापि सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ, केंद्रीय कार्यालय ३ 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर यांच्याशी सक्षम देवगिरी प्रांत नांदेड हि संस्था संलग्न असुन, महानगरपालिका क्षेत्रात सालसन 2008 पासुन काम करित आहे.सक्षम देवगिरी प्रांत नांदेड या संस्थेने अंध व अपंग कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित केलेला असल्यामुळे व सदर संस्था सक्षम, समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ, केंद्रीय कार्यालय - 16 देव दत्त भवन, राणा प्रताप चौक, प्रताप नगर, नागपुर यांच्या अधिपत्याखाली काम करित असल्याने वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्र सादर करणा-या पंजीकृत संस्थेच्या नावे अनुदान देणे व त्यांच्यामार्फत सक्षम देवगिरी प्रांत नांदेड यांना अनुदान वितरीत करणे क्रमप्राप्त आहे.

करिता उपरोक्त अटीच्या व नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा /साप्रवि/ ३८१०/२०१५ दि.२० जून २०१५ अन्वये वरील कार्यक्रमासाठी रु.1,00,000/- (अक्षरी रुपये लक्ष फक्त/-) चे अनुदान देण्याची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा देते.

**विषय क्र.१२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेकरुंना व जमीन भाडेकरुंना त्यांचे भाडेपटटीची मुदत दि. 31.03.2015 रोजी संपल्यामुळे व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा दि. 24/11/2014 ठराव क्र.111 अन्वये स.संचालक नगररचना मनपा नांदेड हे चालु बाजारभावाने भाडे निश्चीत करतील त्याप्रमाणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) मधील तरतुदीनुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढीसाठी जनहितार्थ स.संचालक नगररचना मनपा नांदेड यांनी चालु बाजारभावाप्रमाणे भाडे निश्चीत केल्याप्रमाणे खालील प्रमाणे 11 व्यापारी मार्केटचे एकुण 388 भाडेकरुकडुन दरमहा भाडे रु.631399/- येत असुन प्रस्तावित दराप्रमाणे भाडे आकारणी केल्यास रु. 2844249/- इतके दरमहा येणार असुन रु. 2212850/- ची दरमहा भाडेवाढ होणार आहे. तसेच जमीन भाडेकरु एकुण 104 असुन दि.31.03.2015 पर्यंत दरमहा भाडे रु.32820/- येत असुन प्रस्तावित दरा प्रमाणे रु.184907/- इतके असुन रु.152049/- इतकी दरमहा वाढ होणार आहे. (माहितीस्तव तक्ता सादर).

| अ.क्र. | मार्केटचे नाव | गाळेसंख्या | आजमितीस भाडे | प्रस्तावित भाडे | वाढीव फरकाचे भाडे |
|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | राजीव गांधी मार्केट | 23 | 37794 | 134913 | 97119 |
| 2 | स्टेडीअम मार्केट | 40 | 56564 | 342000 | 285436 |
| 3 | कै.सोनुले मार्केट | 35 | 57167 | 116952 | 59785 |
| 4 | म.फुले मार्केट | 37 | 71638 | 294228 | 222590 |
| 5 | कै.शंकरराव चव्हाण मार्केट | 65 | 66435 | 348512 | 282077 |
| 6 | संत रविदास मार्केट | 26 | 50516 | 127764 | 77248 |
| 7 | इतवारा दवाखाना मार्केट | 15 | 25227 | 54390 | 29163 |
| 8 | केळी मार्केट इतवारा | 24 | 58080 | 195480 | 137400 |
| 9 | नंदीग्राम मार्केट | 70 | 119951 | 831440 | 711489 |
| 10 | कै.तरोडेकर मार्केट वजिराबाद | 16 | 18761 | 58454 | 39693 |
| 11 | मध्यवर्ती जकात नाका | 37 | 69266 | 340116 | 270850 |
| | एकुण | 388 | 631399 | 2844249 | 2212850 |
| 12 | जनता मार्केट | 64 | सदरील मार्केटची इमारत धोकादायक असल्यामुळे भाडेकरुंना गाळे रिकामे करण्याबाबत नोटीस देण्यात आली असुन भाडेकरुंनी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. | | |
| 13 | म.रणजितसिंह मार्केट | 47 | सदरील मार्केट PPP तत्वावर विकसित करण्यात येत असुन बांधकाम चालु आहे. | | |
| 14 | जमीन भाडेकरु | 104 | 32820 | 184907 | 152089 |

तसेच मनपाचे जनता मार्केट शिवाजीनगर येथे एकुण 64 भाडेकरु असुन दरमहा रु.118660/- इतके भाडे येते.सदरील मार्केटची इमारत स्ट्रक्चरल ऑडीटनुसार धोकादायक असल्याचा अहवाल आल्यामुळे भाडेकरुंना गाळे रिकामे करुन देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये नोटीस देण्यात आली असता भाडेकरुंनी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदरील प्रकरणात न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करणे योग्य. तसेच मनपाचे महाराजा रणजितसिंह मार्केट जुना मोंढा हे PPP तत्वावर

विकसित करण्यात येत असुन एकुण 47 भाडेकरु आहेत व दरमहा भाडे रु.67736/- इतके आहे. बांधकाम प्रगतीपथावर असुन बांधकाम पुर्ण झाल्यानंतर स.संचालक नगररचना मनपा नांदेड यांच्याकडुन चालु बाजारभावाप्रमाणे भाडे निश्चीत करुन आकारणी करणे योग्य.

तसेच ज्या भाडेकरुंचे पुर्वीच्या भाडेपेक्षा प्रस्तावित केलेले भाडे कमी आहे त्या भाडेकरुंना पुर्वीचे जुने भाडेमध्ये 10% भाडेवाढ करण्यात यावी.

तरी पुढील 3 वर्षासाठी म्हणजेच दि.01.04.2015 ते 31.03.2018 पर्यंत भाडेवाढ व मुदतवाढ करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर (सोबत प्रस्तावित भाडेवाढीची यादी सादर).

**विषय क्र.२०** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या दुकानाच्या/जागेच्या भाडेपटयाची मुदत दि.३१.३.२००० रोजी संपलेली आहे अशा सर्व दुकान,जमिन भाडेकरुनां मनपा तर्फे कारण दाखवा नोटीस दि.६.५.२०१५ रोजी जा.क्र.जवमा/२०७७/१५ अन्वये देण्यात आलेल्या नोटीसी त्या अनुषंगाने दुकान व जागेचे भाडेकरुंनी दिलेला खुलासा आधारे मा.महापौर यांनी जमिन व दुकाने भाडेकरुंशी चर्चा करुन (वाटाघाटी करुन ) भाडेवाढ करुन व भाडेनिश्चिती करुन मुदतवाढ देण्याचा अधिकार मा.महापौर यांना या ठरावाव्दारे अधिकार देण्यात येत आहे. व तसेच हा ठराव याच सभेमध्ये कायम करण्यात येत आहे.

**सुचक** :- डॉ.सौ.शीला सुनिल कदम **अनु:**-गफार खान गुलाम महमंद खान,सौ.सविता मारोतराव कंठेवाड, उमरेकर अशोक रावन, स.शेर अली

**महापौरा** रेडीरेकनर प्रमाणे भाडे हे पुर्वीच्या भाडेपेक्षा ४-५ पटीने वाढ होत असल्यामूळे मनपाकेचे भाडेकरु एवढया जासतीचे दराने भाडे भरणार नाही ते कोर्टात जातील त्यामूळे एकदमच भाडयात वाढ न करता मनपाकेच्या मालकीचे ११ व्यापारी मार्केटचे एकुण ३८८ भाडेकरुकडुन जमिन भाडेकरुंना सध्याच्या भाडयात दरवर्षाला ३० टक्के याप्रमाणे भाडेवाढ करुन तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.प्रस्तावातील उर्वरीत बाबीस आयुक्तांनी शिफारीस केल्यानुसार मान्यता देण्यात येते. व हा ठराव याचसभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.३०** **ठराव**

आयुक्त,नांवामनपा नांदेड यांनी खालील महानगरपालिकेच्या मालकीच्या ११ व्यापारी संकुलातील एकूण ३८८ भाडेकरुंची जमिन भाडेकरुंच्या भाडयात स.संचालक नगररचना मनपा नांदेड यांनी रेडीरेकनर प्रमाणे निश्चित केलेल्या दाने वाढ करण्याचा प्रस्ताव दिलला आहे.परंतु रेडीरेकनर प्रमाणे भाडे हे पुर्वीच्या भाडेपेक्षा ४-५ पटीने वाढ होत असल्यामूळे मनपाकेचे भाडेकरु एवढया जास्तीचे दराने भाडे भरणार नाही ते कोर्टात जातील त्यामूळे एकदमच भाडयात वाढ न करता खालील व्यापारी संकुंलातील भाडेंकरुना व १०४ जमिन भाडेकरुना भाडेपटीची मुदत संपलेल्या तारखेपासून सध्याच्या भाडयात प्रतिवर्ष ३० टक्के याप्रमाणे भाडेवाढ करुन तीन वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजे दि.१.४.२०१५ ते दि. ३१.३.२०१८ पर्यंत मुदतवाढ करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | गाळेसंख्या |
|---|---|---|
| | 2 | 3 |
| 1 | राजीव गांधी मार्केट | 23 |
| 2 | स्टेडीअम मार्केट | 40 |
| 3 | कै.सोनुले मार्केट | 35 |
| 4 | म.फुले मार्केट | 37 |
| 5 | कै.शंकरराव चव्हाण मार्केट | 65 |
| 6 | संत रविदास मार्केट | 26 |
| 7 | इतवारा दवाखाना मार्केट | 15 |
| 8 | केळी मार्केट इतवारा | 24 |
| 9 | नंदीग्राम मार्केट | 70 |
| 10 | कै.तरोडेकर मार्केट वजिराबाद | 16 |
| 11 | मध्यवर्ती जकात नाका | 37 |
| | एकुण | 388 |

तसेच मनपाचे जनता मार्केट शिवाजीनगर येथे एकुण ६४ भाडेकरु असुन दरमहा रु.118660/- इतके भाडे येते.सदरील मार्केटची इमारत स्ट्रक्चरल ऑडीटनुसार धोकादायक असल्याचा अहवाल आल्यामुळे भाडेकरुंना गाळे रिकामे करुन देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81 ब (2) अन्वये नोटीस देण्यात आली असता भाडेकरुंनी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदरील प्रकरणात न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर न्यायालयाचे निर्णयानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी, तसेच मनपाचे महाराजा रणजितसिंह मार्केट जुना मोंढा हे

PPP तत्वावर विकसित करण्यात येत असुन एकुण 47 भाडेकरु आहेत व दरमहा भाडे रु.67736/- इतके आहे. बांधकाम प्रगतीपथावर असुन बांधकाम पुर्ण झाल्यानंतर स.संचालक नगररचना मनपा नांदेड यांच्याकडुन चालु बाजारभावाप्रमाणे भाडे निश्चीत करुन आकारणी करण्यात यावी असे ही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. १३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत गणपती व नवरात्र उत्सव, रमजान महिना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व सर्वधर्मीय उत्सव, सण रस्त्यावर साजरे केले जातात या उत्सवा दरम्यान मोठ्या प्रमाणात रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला फुटपाथवर मंडप उभारण्यासाठी नागरीक व्यवसायीक व विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 234 अन्वये मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्या किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकायाच्या सहमतीने आयुक्तास कोणत्याही रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यासाठी लेखी परवानगी देऊ शकतात.

तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि. 02.04.2013 ठराव क्र.26 अन्वये खालील प्रमाणे शुल्क आकारणी चा ठराव संमत झाला आहे. त्याप्रमाणे यापूर्वी शुल्क आकारणी करून परवानगी देण्यात येत होती.

| अनु.क्र | परवानगीचा प्रकार | शुल्क |
|---|---|---|
| 1 | वैयक्तिक व खाजगी कार्यक्रमासाठी | 5 रू. प्रति चौफुट, |
| 2 | वाणिज्य वापरासाठी | रू.10 प्रती चौफुट |
| 3 | सभेसाठी | रू.1000/-प्रतीदिन |
| 4 | धार्मिक / सामाजिक कार्यक्रमासाठी | निशुल्क |

उत्सव, सण साजरे करताना पर्यावरणावर परिणाम होणार नाही, ध्वनी प्रदुषण होणार नाही व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. डॉ महेश बेडेकर विरूद्ध महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. 173/2010 अन्वये मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजिवन विस्कळीत होऊ न देता पर्यावरणावर परिणाम न होता जनहितार्थ मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३४ अन्वये तात्पुरते मंडप किंवा असे कोणतेही बांधकाम यांना परवानगी देतांना खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत.

**अर्ज सादर करण्याची पद्धती:-**

1. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता / सार्वजनिक ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यास परवानगी मिळणे बाबत संबंधीत नागरीकांनी व्यवसायीकांनी, संस्थेने, मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या / कार्यक्रमाच्या 30 दिवस आगोदर संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.(मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केल्यानुसार )
2. संबंधीत मंडळाने / संस्थेने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी रस्त्याच्या 1/4 भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधीत मंडळाने / संस्थेने घ्यावयाची आहे. मंडप / स्टेज इ. उभारणी करिता प्रचलित आकारा प्रमाणे उभारणीसाठी तक्ता खालीलप्रमाणे.

| रस्त्याची रूंदी | मंडप / स्टेजसाठी दिली पाहिले अशी कमाल रूंदी | मोकळी / खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रूंदी |
|---|---|---|
| 25 फुट | 6.25 फुट | 18.75 फुट |
| 50 फुट | 12.5 फुट | 37.5 फुट |
| 70 फुट | 17.5 फुट | 52.5 फुट |
| १०० फुट | २५ फुट | ७५ फुट |

**ना हरकत दाखल्यासह अर्ज सादर करणे**

3. संबंधीत मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी खालील ना हरकत पत्र दाखल करावे लागेल.
   १. मा. जिल्हा दंडाधिकारी नांदेड किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणताही अधिकारी,
   २. शहर वाहतूक पोलीस शाखा, नांदेड
   ३. संबंधीत पोलीसस्टेशन,
   ४. महानगरपालिका अग्निशमन विभाग
   ५. **पुर्व इतिहासः**
4. मागील वर्षी किंवा वेळेस ज्या मंडळांना मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती त्याच जागेवर अर्जाच्या वेळी परवानगी देण्यात येईल परंतू प्रशासकिय आवश्यकतेनुसार योग्य तो बदल करण्यात येईल.
5. मागील वर्षी किंवा वेळेस ज्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली होती तेवढ्याच आकाराचा किंवा रस्त्याच्या 1/4 भागापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी परवानगी देण्यात येईल.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका

आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही ? त्याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप / स्टेज आकार कमी करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत.

6. महानगरपालिकेने परवानगी देल्यानुसारच मंडप / स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळ / संस्थेस बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळ / संस्थेने मंडप / स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते महानगरपालिका संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी पोलीस अधिका-यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल व संबंधीतावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व सदरील मंडप /

7. स्टेज सुचनेप्रमाणे नसल्यास महानगरपालिका पूर्वसुचना न देता काढू शकते.आणि त्या साठीचा खर्च देखील संबंधितांकडून वसुल करण्यात येईल.

8. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.ईएनव्ही-2010/प्र.क्र.106/ता.क. 3 दि.03.05.2011 अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

9. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेले शासन निर्णय व मा. उच्चा न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधीत मंडळाने करणे बंधनकारक आहे.

- **दक्षता:**

10. ज्या प्रस्तावित मंडप / स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप / स्टेज इ. उभारण्याकरिता किमान 12 फुट रूंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरीता उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.

10. संबंधीत मंडळाने / संस्थेने मंडप / स्टेज इ. यांची उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रूंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शन पासून लांब राहील जेणेकरून वाहने वळविणे सोपे होईल अशा पद्धतीने कार्यवाही करावी.

11. संबंधीत मंडळास किंवा संस्थेस मंडप / स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट कॉंक्रेट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरिता परवानगी देण्यात येणार नाही अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप / स्टेज याकरिता आवश्यक असणारे बांबु रोवून त्यापासून अथवा पुर्वनियोजीत व्यवस्थापनाप्रमाणे मंडप / स्टेज याकरिता बांबु लावण्यात यावेत. रस्ते / सार्वजनिक खोदाई करून मंडप / स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत मंडळावर संस्थेवर रस्ते अनाधिकृतपणे खोदाई बाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.व त्याचा खर्च सुध्दा त्यांचेकडून वसुल करण्यात येईल.

12. ज्या ठिकाणी पक्या स्वरूपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील 12 फुट व्यतिरिक्त जागेत मंडपाची उभारणी संबंधीत मंडळाने करावी.

13. कोणत्याही ठिकाणी 8 फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप अथवा स्टेज इ. उभारणीकरिता महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येणार नाही. मंडप / स्टेज इ. चे अंतर विद्युत तार व डिपी बॉक्सपासुन 6 फुट अंतरावर ठेवणे बंधनकारक आहे.

14. संबंधीत कार्यक्रम किंवा सार्वजनिक उत्सवाकरिता आवश्यक विद्युत कनेक्शन महानगरपालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधुन घेता येणार नाही असे आढळून आल्यास संबंधीत मंडळावर दंडात्मक कार्यकाही करून त्याची परवानगी रद्द करण्यात येईल.

15. संबंधीत मंडळाला / संस्थेला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त 15 मी अंतरापर्यंतच विद्युत रोशनाई करता येईल.

- **शुल्क वसूली:**

16. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्ता / सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणासाठी मंडप / स्टेज उभारणेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.02.04.2013 ठराव क्र.26 अन्वये खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येते.त्यानुसार शुल्काचा भरणा केल्यानंतरच परवानगी देण्यात येईल.

| अनु.क्र | परवानगीचा प्रकार | शुल्क |
|---|---|---|
| 1 | वैयक्तिक व खाजगी कार्यक्रमासाठी | 5 रू. प्रति चौफुट, |
| 2 | वाणिज्य वापरासाठी | रू.10 प्रती चौफुट |
| 3 | सभेसाठी | रू.1000/-प्रतीदिन |
| 4 | धार्मिक / सामाजिक कार्यक्रमासाठी | निशुल्क |

- **परवानगी कालावधी:**

17. सार्वजनिक रस्ते तात्पुरते वापरण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांचेसाठी ५ दिवस व सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांचे बाबतीत १५ दिवस यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

- **ध्वनीप्रदुषण तक्रारीबाबत कार्यपद्धती:**

18. सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तिव्रता, औद्योगीक कामे विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनीवर्धक (लाऊड स्पिकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनामुळे ध्वनी प्रदुषणाचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ठ परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखन्याच्या हेतुने ध्वनी निर्माण करणा-या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि.21.04.2009 अन्वये ध्वनिप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम 2000 ची प्रभावीपणे अमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

19. बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी / स्त्रोत जसे D.G. sets, Generator sets, इमारतीसाठी वापरण्यात येणा-या सुविधा, घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनीप्रदुषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असावी.

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र / झोन प्रवर्ग | डेबि (ए) एल ईक्यु दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | 75 | 70 |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | 65 | 55 |
| (क) | निवासी क्षेत्र | 55 | 45 |
| (ड) | शांतता क्षेत्र | 50 | 40 |

**टीप:-**

1. दिवसा म्हणजे सकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत
2. रात्री म्हणजे रात्री 10 ते सकाळी 6 पर्यंत
3. शांतता क्षेत्र म्हणजे रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषीत केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या 100 मी. पर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.
4. संमिश्र क्षेत्र हे वर नमुद केलेल्या 4 पैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिका-याकडून घोषीत करण्यात येईल.

20. ध्वनीप्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारीची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था करण्यात येत आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदुषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रूमला अग्रेषित करण्यात येईल.

- **शांतता क्षेत्र :**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत जा.क्र.साप्रवि/5293/15, दि.21.07.2015 अन्वये शांतता क्षेत्र घोषीत करण्यात आलेले आहेत.

- **तक्रार निवारण व्यवस्था :-**

21. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाचे वेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्यामंडपाबाबत तसेच ध्वनीप्रदुषणाबाबत, नागरिकांनी संबंधीत क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे तक्रार करावी. तसेच आपात्कालिन विभागाचे टोलफ्री नंबर, खालील प्रमाणे उपलब्ध केलेली आहेत व त्यास उचित प्रसिद्धी देण्यात येत आहे

टोल फ्री नं.एमएच 18002334949
ई-मेल- info@nwcmc.gov.in
Sms सुविधा- 1) क्षेत्रिय कार्यालय क्रं.अ -9011000967
2) क्षेत्रिय कार्यालय क्रं.ब -9011000936
3) क्षेत्रिय कार्यालय क्रं.क -9011001017
4) क्षेत्रिय कार्यालय क्रं.ड -9011001018

22. वरील प्रमाणे अमलबजावणीस्तव सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना अधिकार प्रदान करण्यात येते. .

23. ध्वनीप्रदूषण व इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची / संस्थेची राहील.

24. पोलीस, वाहतूक यंत्रणा, शासन यंत्रणा यांनी दिलेले सर्वनिर्देषांचे काटेकोर पालन करणे मंडळास / संस्थेस बंधनकारक राहील.

25. मंडळाने/संस्थेने सदरील परवानगी दर्शनी भागावर ठळकपणे लावली पाहिजे.

26. रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही बांधकामामुळे जनतेस उपद्रव होत असल्यास फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 133 अन्वये संबंधित पोलीस स्टेशन मध्ये संबंधिताविरुध्द तक्रार दाखल करण्यात येईल. तरी सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभेसमोर सादर

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.३१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत गणपती व नवरात्र उत्सव, रमजान महिना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व सर्वधर्मीय उत्सव, सण रस्त्यावर साजरे केले जातात या उत्सवा दरम्यान मोठ्या प्रमाणात रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला फुटपाथवर मंडप उभारण्यासाठी नागरीक व्यवसायीक व विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 234 अन्वये मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्या किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिका-याच्या सहमतीने आयुक्तास कोणत्याही रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यासाठी लेखी परवानगी देण्याचे अधिकार असून वरील प्रमाणे उत्सव, सण साजरे करताना पर्यावरणावर परिणाम होणार नाही, ध्वनी प्रदुषण होणार नाही व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. डॉ

महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र.173/2010 अन्वये मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देश सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजिवन विस्कळीत होऊ न देता पर्यावरणावर परिणाम न होता जनहितार्थ मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३४ अन्वये तात्पुरते मंडप किंवा असे कोणतेही बांधकाम यांना परवानगी देतांना खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात असून सदर मार्गदर्शक तत्वास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते. आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**अर्ज सादर करण्याची पद्धती:-**

11. सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता / सार्वजनिक ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यास परवानगी मिळणे बाबत संबंधीत नागरीकांनी व्यवसायीकांनी, संस्थेने, मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या / कार्यक्रमाच्या 30 दिवस आगोदर संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.(मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केल्यानुसार )

12. संबंधीत मंडळाने / संस्थेने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी रस्त्याच्या 1/4 भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधीत मंडळाने /

13. संस्थेने घ्यावयाची आहे. मंडप / स्टेज इ. उभारणी करिता प्रचलित आकारा प्रमाणे उभारणीसाठी तक्ता खालीलप्रमाणे.

| रस्त्याची रूंदी | मंडप / स्टेजसाठी दिली पाहिले अशी कमाल रूंदी | मोकळी / खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रूंदी |
|---|---|---|
| 25 फुट | 6.25 फुट | 18.75 फुट |
| 50 फुट | 12.5 फुट | 37.5 फुट |
| 70 फुट | 17.5 फुट | 52.5 फुट |
| १०० फुट | २५ फुट | ७५ फुट |

**ना हरकत दाखल्यासह अर्ज सादर करणे**

14. संबंधीत मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी खालील ना हरकत पत्र दाखल करावे लागेल.

६. मा. जिल्हा दंडाधिकारी नांदेड किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणताही अधिकारी,

७. शहर वाहतूक पोलीस शाखा, नांदेड

८. संबंधीत पोलीसस्टेशन,

९. महानगरपालिका अग्निशमन विभाग

१०. **पुर्व इतिहास:**

15. मागील वर्षी किंवा वेळेस ज्या मंडळांना मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती त्याच जागेवर अर्जाच्या वेळी परवानगी देण्यात येईल परंतू प्रशासकिय आवश्यकतेनुसार योग्य तो बदल करण्यात येईल.

16. मागील वर्षी किंवा वेळेस ज्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली होती तेवढ्याच आकाराचा किंवा रस्त्याच्या 1/4 भागापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी परवानगी देण्यात येईल.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही ? त्याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप / स्टेज आकार कमी करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत.

17. महानगरपालिकेने परवानगी देल्यानुसारच मंडप / स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळ / संस्थेस बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळ / संस्थेने मंडप / स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते महानगरपालिका संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी पोलीस अधिका-यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल व संबंधीतावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व सदरील मंडप / स्टेज सुचनेप्रमाणे नसल्यास महानगरपालिका पूर्वसुचना न देता काढू शकते.आणि त्या साठीचा खर्च देखील संबंधितांकडून वसुल करण्यात येईल.

18. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.ईएनव्ही-2010/प्र.क्र.106/ता.क. 3 दि.03.05.2011 अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

19. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेले शासन निर्णय व मा. उच्चा न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधीत मंडळाने करणे बंधनकारक आहे.

- **दक्षता:**

20. ज्या प्रस्तावित मंडप / स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप / स्टेज इ. उभारण्याकरिता किमान 12 फुट रूंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅंककरीता उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.

10. संबंधीत मंडळाने / संस्थेने मंडप / स्टेज इ. यांची उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रूंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शन पासून लांब राहील जेणेकरून वाहने वळविणे सोपे होईल अशा पद्धतीने कार्यवाही करावी.

11. संबंधीत मंडळास किंवा संस्थेस मंडप / स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट कॉंक्रेट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरिता परवानगी देण्यात येणार नाही अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप / स्टेज याकरिता आवश्यक असणारे बांबु रोवून त्यापासून अथवा पुर्वनियोजीत व्यवस्थापनाप्रमाणे मंडप / स्टेज याकरिता बांबु लावण्यात यावेत.

रस्ते / सार्वजनिक खोदाई करून मंडप / स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत मंडळावर संस्थेवर रस्ते अनाधिकृतपणे खोदाई बाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.व त्याचा खर्च सुध्दा त्यांचेकडून वसुल करण्यात येईल.

12. ज्या ठिकाणी पक्या स्वरूपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील 12 फुट व्यतिरिक्त जागेत मंडपाची उभारणी संबंधीत मंडळाने करावी.

13. कोणत्याही ठिकाणी 8 फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप अथवा स्टेज इ. उभारणीकरिता महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येणार नाही. मंडप / स्टेज इ. चे अंतर विद्यूत तार व डिपी बॉक्सपासुन 6 फुट अंतरावर ठेवणे बंधनकारक आहे.

14. संबंधीत कार्यक्रम किंवा सार्वजनिक उत्सवाकरिता आवश्यक विद्युत कनेक्शन महानगरपालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधुन घेता येणार नाही असे आढळून आल्यास संबंधीत मंडळावर दंडात्मक कार्यकाही करून त्याची परवानगी रद्द करण्यात येईल.

15. संबंधीत मंडळाला / संस्थेला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त 15 मी अंतरापर्यंतच विद्युत रोशनाई करता येईल.

- **शुल्क वसूली:**

16. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्ता / सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणासाठी मंडप / स्टेज उभारणेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.02.04.2013 ठराव क्र.26 अन्वये खालील

17. प्रमाणे शुल्क आकारण्यात येते.त्यानुसार शुल्काचा भरणा केल्यानंतरच परवानगी देण्यात येईल.

| अनु.क्र | परवानगीचा प्रकार | शुल्क |
|---|---|---|
| 1 | वैयक्तिक व खाजगी कार्यक्रमासाठी | 5 रू. प्रति चौफुट, |
| 2 | वाणिज्य वापरासाठी | रू.10 प्रती चौफुट |
| 3 | सभेसाठी | रू.1000/-प्रतीदिन |
| 4 | धार्मिक / सामाजिक कार्यक्रमासाठी | निशुल्क |

- **परवानगी कालावधी:**

17. सार्वजनिक रस्ते तात्पुरते वापरण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांचेसाठी ५ दिवस व सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांचे बाबतीत १५ दिवस यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

- **ध्वनीप्रदुषण तक्रारीबाबत कार्यपद्धती:**

18. सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तिव्रता, औद्योगीक कामे विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेर्टस), ध्वनीवर्धक (लाऊड स्पिकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनामुळे ध्वनी प्रदुषणाचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ठ परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखन्याच्या हेतुने ध्वनी निर्माण करणा-या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि.21.04.2009 अन्वये ध्वनिप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम 2000 ची प्रभावीपणे अमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

19. बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी / स्त्रोत जसे D.G. sets, Generator sets, इमारतीसाठी वापरण्यात येणा-या सुविधा, घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनीप्रदुषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असावी.

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र / झोन प्रवर्ग | डेबि (ए) एल ईक्यु दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | 75 | 70 |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | 65 | 55 |
| (क) | निवासी क्षेत्र | 55 | 45 |
| (ड) | शांतता क्षेत्र | 50 | 40 |

**टीप:-**

5. दिवसा म्हणजे सकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत
6. रात्री म्हणजे रात्री 10 ते सकाळी 6 पर्यंत
7. शांतता क्षेत्र म्हणजे रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषीत केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या 100 मी. पर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.
8. संमिश्र क्षेत्र हे वर नमुद केलेल्या 4 पैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिका-याकडून घोषीत करण्यात येईल.

21. ध्वनीप्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारीची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था करण्यात येत आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदुषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रूमला अग्रेषित करण्यात येईल.

- **शांतता क्षेत्र :**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत जा.क्र.साप्रवि/5293/15, दि.21.07.2015 अन्वये शांतता क्षेत्र घोषीत करण्यात आलेले आहेत.

- **तक्रार निवारण व्यवस्था :-**

22. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाचे वेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मंडपाबाबत तसेच ध्वनीप्रदुषणाबाबत, नागरिकांनी संबंधीत क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे तक्रार करावी. तसेच आपात्कालिन विभागाचे टोलफ्री नंबर, खालील प्रमाणे उपलब्ध केलेली आहेत व त्यास उचित प्रसिद्धी देण्यात येत आहे

टोल फ्री नं.एमएच 18002334949
ई-मेल- info@nwcmc.gov.in
Sms सुविधा- 1) क्षेत्रिय कार्यालय क्रं.अ -9011000967
2) क्षेत्रिय कार्यालय क्रं.ब -9011000936
3) क्षेत्रिय कार्यालय क्रं.क -9011001017
4) क्षेत्रिय कार्यालय क्रं.ड -9011001018

22. वरील प्रमाणे अमलबजावणीस्तव सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना अधिकार प्रदान करण्यात येते. .

23. ध्वनीप्रदूषण व इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची / संस्थेची राहील.

24. पोलीस, वाहतूक यंत्रणा, शासन यंत्रणा यांनी दिलेले सर्वनिर्देषांचे काटेकोर पालन करणे मंडळास / संस्थेस बंधनकारक राहील.

25. मंडळाने/संस्थेने सदरील परवानगी दर्शनी भागावर ठळकपणे लावली पाहिजे.

26. रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही बांधकामामुळे जनतेस उपद्रव होत असल्यास फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 133 अन्वये संबंधित पोलीस स्टेशन मध्ये संबंधिताविरुध्द तक्रार दाखल करण्यात येईल.

**विषय क्र. १४**

श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम हे नांदेड शहरातील एकमेव क्रिकेट खेळाचे मैदान असून सदर मैदान अंतरराष्ट्रीय मानका प्रमाणे विकसीत करणे बाबत क्रिडा प्रेमीकडुन सातत्याने मागणी होत आहे.

श्री. गुरु गोविंदसिंघजी क्रिडा संकुल हे शहराच्या मध्यभागी असून संकुला जवळच रेल्वे स्टेशन, विमानतळ तसेच शहरातील प्रमुख हॉटेल्स इत्यादी सुविधा अस्तित्वात आहेत. नांदेड शहर हे भारतातील सर्व प्रमुख शहराशी विमान सेवा तसेच रेल्वे सेवा याद्वारे जोडल्या गेले आहे.

सदर स्टेडीयमचा आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे विकास झाल्यास मैदानावर रणजी ट्रॉफी, आयपीएल इत्यादी राष्ट्रीय स्पर्धा खेळवल्या जाऊ शकतील पर्यायाने शहराच्या विकासास हातभार लावुन शहरात पर्यटन, शहर सौदर्यीकरण इत्यादी बाबींस चालना मिळणार आहे व याद्वारे नांदेड शहराचा जागतीक पातळीवर लौकिक वाढणार आहे. सदर मैदानाचा विकास करण्यासाठी सालसन 2014-15 च्या अंदाजपत्रकात श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे या शिर्षाखाली रु. 2.00 कोटीची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

सदर मैदान विकसीत करणेसाठी अस्तित्वातील मैदानाचे खोदकाम करुन वाळु, खडी, माती इत्यादी साहित्याचा भराव करणे, मैदानावरील पाण्याच्या निचरा करण्याच्या दृष्टीने HDPE पाईपद्वारे व्यवस्था, मैदानावर हिरवळ लावणे सराव-खेळ पट्टया तयार करणे इ. कामे नियुक्त कंत्राटदारामार्फत हाती घेण्यात आली असून या व्यतिरीक्त मैदानाच्या बाहेरील बाजुने नालीचे बांधकाम करणे तसेच मैदानासाठी आवश्यक पाण्याच्या साठवणीसाठी जलतरणीकेचे पाणी वापरुन पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी टाकीचे बांधकाम करणे मैदान विकासासाठी आवश्यक साहित्य पुरवठा करणे इ. कामे महापालिकेमार्फत हाती घेण्यात आली असून त्याच प्रमाणे स्टेडियम अंतर्गत दक्षिण बाजुस सराव खेळ पट्टया तयार करण्यात येत असून उक्त सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

उक्त कामे करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना पत्र देवुन रु. 3.80 कोटीची आवश्यता असल्याचे दर्शवुन निधी उपलब्ध करुन यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

सद्या स्टेडियम मैदान विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर कामासाठी रु.180.00 लक्ष खर्च येणार आहे. त्याचप्रमाणे मैदान विकासासाठी साहित्य रेती, खडी,माती खरेदी करणे रु. 83.00 लक्ष, मैदाना सभोवती चेन लिंक वायर फेन्सींग करणे रु.25.00 लक्ष, स्टेडियम सभोवती आर.सि.सि. नालीचे बांधकाम करणे रु.45.00 लक्ष, स्टेडियम अंतर्गत sump व पाईप लाईन करणे रु.35.00 लक्ष, मैदाना सभोवती Jogging Track तयार करणे रु.15.00 लक्ष, त्याच प्रमाणे स्टेडियम येथे लाल मातीच्या सराव खेळ पट्टया विकसीत करण्यासाठी रु.42.00 लक्ष, अशा प्रकारे उक्त कामासाठी अंदाजीत रु. 425.00 लक्षची आवश्यकता असुन सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

वरिल कामा व्यतीरिक्त उर्वरीत कामे जसे दक्षिण बाजु व उत्तर बाजु पॅवेलीयन नाविनी करण करणे, प्रेक्षागृह गॅलरी दुरुस्ती, विद्युत व्यवस्था (Highmast), स्टेडियमच्या देखभालीसाठी लागणारे साहित्य खरेदी इत्यादीची आवश्यकता असुन त्यासाठी अंदाजीत रु.10.00 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.सदर निधी उपलब्ध होणेसाठी गुरुद्वारा संचखड बोर्ड नांदेड यांना मागणी करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर

**महापौर** प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.३२** **ठराव**

श्री. गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयमच्या दक्षिण बाजु व उत्तर बाजु पॅवेलीयन नाविनी करण करणे, प्रेक्षागृह गॅलरी दुरुस्ती, विद्युत व्यवस्था (Highmast), स्टेडियमच्या देखभालीसाठी लागणारे साहित्य खरेदी इत्यादी करीता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यासाठी गुरुद्वारा संचखड बोर्ड नांदेड यांना विनंती करण्याचा प्रस्ताव ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा ना मंजुर करते.

**विषय क्र. १५**

महाराष्ट्र शासन,अल्पसंख्याक विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक क्षेविका-2015/प्र.क्र.76/का-9 मंत्रालय मुंबई 32 दि. 18.06.2015 अन्वये राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देवुन अल्पसंख्याक समुदायाच्या एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचावण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागाने सन 2008-09 या वर्षापासून राज्यातील नागरी क्षेत्राकरिता क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित केला आहे.

राज्यातील ज्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या एकुण लोकसंख्येपैकी किमान 10% लोकसंख्या अल्पसंख्याकांची (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी) आहे, अशा अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रांत खालील मुलभूत नागरी सुविधांच्या उपलब्धतेसाठी शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

1. कब्रस्तानची व अंत्यांवेधीच्या जागेची दुरुस्ती, 2. पिण्याच्या पाण्याची सुविधा,
3. विद्युत पुरवठा, 4. सांडपाण्याची व्यवस्था,
5. रस्ते/पथदिवे 6. सार्वजनिक स्वच्छतागृह,
7. आंगणवाडी, बालवाडी केंद्रे, 8. समाज मंदिर/ सामाजिक सभागृह इ.
9. इदगाह.

(* महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या अखत्यारितील कब्रस्तानांबरोबरच ज्या कब्रस्तानांचे व्यवस्थापन नोंदणीकृत सार्वजनिक न्यासांमार्फत केले जाते, अशा कब्रस्तानांनाही या योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय असेल.)

या योजने अंतर्गत महानगरपालिकांना कमाल रु. 20.00 लक्ष अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

सदर योजनेची कार्यपध्दती अन्वये मुद्दा क्र. अ मधील 2 अन्वये क्षेत्रविकास कार्यक्रमातंर्गत विकास काम हाती घेण्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्याठरावाची प्रत आवश्यक आहे.

करिता सालसन 2015-16 या वर्षासाठी अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.20.00 लक्षाचे कामे प्रस्तावित करण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांनी मांडलेल्या दुरुस्तीप्रस्तावासह आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ३३** **ठराव**

महाराष्ट्र शासन,अल्पसंख्याक विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक क्षेविका-2015/प्र.क्र.76/का-9 मंत्रालय मुंबई 32 दि. 18.06.2015 अन्वये राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देवुन अल्पसंख्याक समुदायाच्या एकंदर जीवन मानाचा दर्जा उंचावण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागाने सन 2008-09 या वर्षापासून राज्यातील नागरी क्षेत्राकरिता क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित केला आहे.

राज्यातील ज्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या एकुण लोकसंख्येपैकी किमान 10% लोकसंख्या अल्पसंख्याकांची (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी) आहे, अशा अल्पसंख्याक बहुल महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रांत खालील मुलभूत नागरी सुविधांच्या उपलब्धतेसाठी शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

1. कब्रस्तानची व अंत्यांवेधीच्या जागेची दुरुस्ती, 2. पिण्याच्या पाण्याची सुविधा,
3. विद्युत पुरवठा, 4. सांडपाण्याची व्यवस्था,
5. रस्ते/पथदिवे 6. सार्वजनिक स्वच्छतागृह,
7. आंगणवाडी, बालवाडी केंद्रे, 8. समाज मंदिर/ सामाजिक सभागृह इ.
9. इदगाह.

या योजने अंतर्गत महानगरपालिकांना कमाल रु. 20.00 लक्ष अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. करिता सालसन 2015-16 या वर्षासाठी अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.20.00 लक्षाचे कामे प्रस्तावित करण्याचे अधिकार महापौर,नांवामनपा नांदेड यांना ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. १६**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी दि.21.2.15 रोजी विनंती अर्ज व महापौर यांनी दिनांक17.03.2015 रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने कर्मचा-यांना निवासासाठी जागा व घरे उपलब्ध करुन देणे बाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने मालमत्ता विभागाने मौजे वजिराबाद येथील सर्वे नं.60 –A मधील गार्डन या आरक्षणाखाली जवळपास ८ एकर जागा विकास हस्तांतरण हक्क (T.D.R) अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे. तरी सदरील जागा नांवामनपाकेतील कर्मचा-यांना घरकुले अथवा निवासी वापरासाठी आरक्षण करण्यासाठी कार्यवाही करण्यास कळविले आहे.

नांदेड शहराचे मंजूर सुधारित विकास योजनेनुसार मौजे वजिराबाद भागश: स.नं.60 61 सवसेक्टर A मध्ये,

1) आरक्षण क्र. ए-2 'दफन भूमी' क्षेत्र 0.45 हेक्टर
2) आरक्षण क्र. ए-3 'स्मशान भूमी' क्षेत्र 0.45 हेक्टर,
3) आरक्षण क्र. ए-4 'गार्डन' क्षेत्र 4.24 हेक्टर
4) 60.00 मी. विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

सदर जागेपैकी महानगरपालिकेत T.D.R अंतर्गत खालील प्रमाणे जागा प्राप्त झालेली आहे.

1) आरक्षण क्र. ए-2 -'दफन भूमी' क्षेत्र 240 चौ.मी,
2) आरक्षण क्र. ए-3 -'स्मशान भूमी' क्षेत्र 240 चौ.मी,
3) आरक्षण क्र. ए-4 '- गार्डन' क्षेत्र 27812.50 चौ.मी
4) 60.00 मी. D.P. Road खालील जागा – क्षेत्र 3727.50 चौ.मी

एकुण क्षेत्र - 32020 चौ.मी. (3.20 हेक्टर)

वरील प्रमाणे एकुण क्षेत्र 32020 चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे.

तरी, उपरोक्त मागणी प्रमाणे विषयांकीत जागा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना घरे बांधून दयावयाचे असल्यास त्या अनुषंगाने आरक्षणाचे नाव “House for municipal staff” असे बदलून त्यास शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्याअनुषंगाने म.प्रा.न.र.अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या संमती करीता पाठविणे योग्य वाटते.

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.३४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी दि.21.2.15 रोजी विनंती अर्ज व महापौर यांनी दिनांक17.03.2015 रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने कर्मचा-यांना निवासासाठी जागा व घरे उपलब्ध करुन देणे बाबत विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने मालमत्ता विभागाने मौजे वजिराबाद येथील सर्वे नं.60 –A मधील गार्डन या आरक्षणाखाली जवळपास ८ एकर जागा विकास हस्तांतरण हक्क (T.D.R) अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे. तरी सदरील जागा नांवामनपाकेतील कर्मचा-यांना घरकुले अथवा निवासी वापरासाठी आरक्षण करण्यासाठी कार्यवाही करण्यास कळविले आहे.

नांदेड शहराचे मंजूर सुधारित विकास योजनेनुसार मौजे वजिराबाद भागश: स.नं.60 61 सवसेक्टर A मध्ये,

5) आरक्षण क्र. ए-2 'दफन भूमी' क्षेत्र 0.45 हेक्टर
6) आरक्षण क्र. ए-3 'स्मशान भूमी' क्षेत्र 0.45 हेक्टर,
7) आरक्षण क्र. ए-4 'गार्डन' क्षेत्र 4.24 हेक्टर
8) 60.00 मी. विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

सदर जागेपैकी महानगरपालिकेत T.D.R अंतर्गत खालील प्रमाणे जागा प्राप्त झालेली आहे.

5) आरक्षण क्र. ए-2 -'दफन भूमी' क्षेत्र 240 चौ.मी,
6) आरक्षण क्र. ए-3 -'स्मशान भूमी' क्षेत्र 240 चौ.मी,
7) आरक्षण क्र. ए-4 '- गार्डन' क्षेत्र 27812.50 चौ.मी
8) 60.00 मी. D.P. Road खालील जागा – क्षेत्र 3727.50 चौ.मी

एकुण क्षेत्र - 32020 चौ.मी. (3.20 हेक्टर)

वरील प्रमाणे एकुण क्षेत्र 32020 चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे.

तरी, उपरोक्त मागणी प्रमाणे विषयांकीत जागा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना घरे बांधून देण्यासाठी आरक्षणाचे नाव “House for municipal staff” असे बदलून म.प्रा.न.र.अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये विकास योजनेत किरकोळ फेरबदलाचे प्रस्तावास मान्यता देण्यासाठी राज्य शासनास सादर करण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

<u>स. सदस्यांचे प्रस्ताव</u>

**विषय क्र.१७** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील वसरणी प्रभाग क्र.३६ मधील तानाजी मालूसरे चौक ते सुजाता बुध्दविहार मंदिर परिसरात नागोबा मंदिर ,कामाई मदिर ,मारोती मंदिर परिसर जि.प.शाळा परिसर पर्यत रोडवर मोठया प्रमाणात भाविक भक्त व शाळेतील विद्यार्थ्याची वर्दळ असल्यामूळे सदरील परिसरात जळ वाहनामूळे अपघात व वाहतुकीची कोंडी होत असल्यामूळे या रस्त्यावर जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यासाठी मान्यता देणे बाबत

**सुचक** :- संजय मोरे **अनुमोदक**:- सौ.वैजयंती भिमराव गायकवाड

<u>प्रशासकीय टिप्पणी</u>

जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल

**महापौर** स.सदस्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ३५** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील वसरणी प्रभाग क्र.३६ मधील तानाजी मालूसरे चौक ते सुजाता बुध्दविहार मंदिर परिसरात नागोबा मंदिर ,कामाई मदिर ,मारोती मंदिर परिसर जि.प.शाळा परिसर पर्यत रोडवर मोठया प्रमाणात भाविक भक्त व शाळेतील विद्यार्थ्याची वर्दळ असल्यामूळे सदरील परिसरात जळ वाहनामूळे अपघात व वाहतुकीची कोंडी होत असल्यामूळे या रस्त्यावर जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, कार्यालय, नांदेड यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा संमत करते . व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१८** **प्रस्ताव**

जून्या नांदेडवासीयांसाठी जून्या शहरात खेळाचे मैदान नसल्याने या भागातील सर्व जाती जमाती मधील होतकरु गरीब खेळाडूना आपले कौशल्य दाखविण्याचे अवसर मिळत नाही.अनेक जण यापासुन त्रस्त आहे. तरी देगलुर रोड लगत कापुस संशोधन केंद्राची जागा शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेवून त्या ठिकाणी एक मिनि स्टेडियम व खेळाचे मैदान उपलब्ध्द करुन देण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- स.शेर अली महेबुब अली **अनुमोदक**:- शेख हबीब बावजीर,अ.हबीब अ. रहिम बागवान

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांवामनपाकेच्या मंजुर सुधारीत विकास योजना प्रमाणे सेक्टर डि मधील कापुस संशोधन केद्राची जागा ही शासनाची आहे. त्यामूळे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याकरीता शासनाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता लागेल= तसेच EP नुसार कापूस संशोधन केंद्राच्या जागेत आरक्षण क्र. 1) D-2 (A) Garden ,2) D-2 (B) Exst.Cotton Researeach Center ,3) D-2, (C) Banana Research Center, 4) D-3 Garden, 5) D-28 Fruit Market & Godowns, 6) D-29, Police Station ,7) D-29 A Municipal Central naka, 8) D-30 Truck Terminus , हे आरक्षण प्रस्तावित आहेत. व त्यास शासनाची मंजुरी मिळालेली आहे.

वरील सर्व बाब विचारात घेता मिनी स्टेडियम /खेळाचे मैदानसाठी सदर ठिकाणी जागा उपलब्ध्द नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.३६** **ठराव**

जून्या नांदेडवासीयांसाठी जून्या शहरात खेळाचे मैदान नसल्याने या भागातील सर्व जाती जमाती मधील होतकरु गरीब खेळाडूना आपले कौशल्य दाखविण्याचे अवसर मिळत नाही.अनेक जण यापासुन त्रस्त आहे. तरी देगलुर रोड लगत कापुस संशोधन केंद्राची जागा शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेवून त्या ठिकाणी एक मिनि स्टेडियम व खेळाचे मैदान उपलब्ध्द करुन देण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते व ठराव याच सभेत कायम करण्यात येते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.१९** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न स्त्रोत माहे एप्रिल २०१५ ते जून २०१५ पर्यत घटले आहे याबाबत सविस्तर चर्चा करणे.

**सुचक** :- अ.सत्तार अ.गफुर **अनुमोदक**:- आनंद चव्हाण, सौ.अनुजा अमितसिंह तेहरा

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांवाशमनपा केचे प्रूमुख उत्पन्न स्त्रोत माहे एप्रिल २०१५ ते जून २०१५ पर्यतचे मागील वर्षाच्या तुलनेत घटले नसुन वाढ झाली आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| सालसन २०११४ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शिर्षक** | **एप्रिल २०१४** | **मे २०१४** | **जून २०१४** | **एकूण** |
| १ | स्थानिक संस्था कर | ३,६०,८०,८६७ | ३,३८,७३,६०५ | ४,००,०१,३५५ | १०,९९,५५,८२७ |
| २ | मालमत्ता कर | २,५८,१९५, | २६,१५,८३० | ६१,७६,१५३ | ९०,५०,१७८ |
| ३ | बांधकाम शुल्क व हार्डशिप फि | १९,४७,७५३ | ७२,७२,२०६ | १,२०,९३,०१८ | २,१३,१२,९७७ |
| ४ | पाणी पटी व कर | ४,७१,३१४ | ११,३३,९२७ | ३६,४०,४७९ | ५२,४५,७२० |
| | **एकूण** | **३,८७,५८,१२९** | **४,४८,९५,५६८** | **६,१९,११,००५** | **१४,५५,६४,७०२** |
| **सालसन २०११५** | | | | | |
| **अ.क्र.** | **शिर्षक** | **एप्रिल २०१५** | **मे २०१५** | **जून २०१५** | **एकूण** |
| १ | स्थानिक संस्था कर | ४,२४,९४,६०७ | ३,९३,२१,४४४ | ४,१९,६४,७२२ | १२,३७,८०,७७३ |
| २ | मालमत्ता कर | २०,७२,१५२ | ३३,६८,१९७ | ३५,६४,८३० | ९०,०५,१७९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | बांधकाम शुल्क व हार्डशिप फि | १,९१,०१,३८३ | २,५७,५५,१५० | २,४८,५०,०८१ | ६,९७,१३,६१४ |
| ४ | पाणी पटी व कर | १६,१९,८२० | १६,२७,३१४ | २१,९७,८५५ | ५४,४४,९८९ |
| | **एकूण** | **६,५२,९४,९६२** | **७,००,७२,१०५** | **७,२५,७७,४८८** | **२०,७९,४४,५५५** |
| | **फरक वाढ** | **२,६५,३६,८३३** | **२,५१,७६,५३७** | **१,०६,६६,४८३** | **६,२३,७९,८५३** |

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात आलेली उत्पन्नाची आकडेवारीची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. ३७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न स्त्रोतापासून माहे एप्रिल २०१५ ते जून २०१५ पर्यंत मिळालेल्या उत्पन्नाची खालील प्रमाणे माहिती देण्यात आली त्याची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते .

| **सालसन २०११४** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शिर्षक** | **एप्रिल २०१४** | **मे २०१४** | **जून २०१४** | **एकूण** |
| १ | स्थानिक संस्था कर | ३,६०,८०,८६७ | ३,३८,७३,६०५ | ४,००,०१,३५५ | १०,९९,५५,८२७ |
| २ | मालमत्ता कर | २,५८,१९५, | २६,१५,८३० | ६१,७६,१५३ | ९०,५०,१७८ |
| ३ | बांधकाम शुल्क व हार्डशिप फि | १९,४७,७५३ | ७२,७२,२०६ | १,२०,९३,०१८ | २,१३,१२,९७७ |
| ४ | पाणी पटी व कर | ४,७१,३१४ | ११,३३,९२७ | ३६,४०,४७९ | ५२,४५,७२० |
| | **एकूण** | **३,८७,५८,१२९** | **४,४८,९५,५६८** | **६,१९,११,००५** | **१४,५५,६४,७०२** |
| **सालसन २०११५** | | | | | |
| **अ.क्र.** | **शिर्षक** | **एप्रिल २०१५** | **मे २०१५** | **जून २०१५** | **एकूण** |
| १ | स्थानिक संस्था कर | ४,२४,९४,६०७ | ३,९३,२१,४४४ | ४,१९,६४,७२२ | १२,३७,८०,७७३ |
| २ | मालमत्ता कर | २०,७२,१५२ | ३३,६८,१९७ | ३५,६४,८३० | ९०,०५,१७९ |
| ३ | बांधकाम शुल्क व हार्डशिप फि | १,९१,०१,३८३ | २,५७,५५,१५० | २,४८,५०,०८१ | ६,९७,१३,६१४ |
| ४ | पाणी पटी व कर | १६,१९,८२० | १६,२७,३१४ | २१,९७,८५५ | ५४,४४,९८९ |
| | **एकूण** | **६,५२,९४,९६२** | **७,००,७२,१०५** | **७,२५,७७,४८८** | **२०,७९,४४,५५५** |
| | **फरक वाढ** | **२,६५,३६,८३३** | **२,५१,७६,५३७** | **१,०६,६६,४८३** | **६,२३,७९,८५३** |

**विषय क्र.२१** **प्रस्ताव**

सर्पमित्र शंकर रामचंद्र डोकुलवार, हे गेल्या २५ वर्षापासुन नांदेड शहरामधील विविध भागात नागरीकांच्या घरामधील सर्प पकडून त्यांना जंगलात सोडण्याचे काम करीत आहेत.दुदैवाने दि.७ जूलै २०१५ रोजी मुंजाजी नगर भागातील एका नागरीकांच्या घरी सकाळी १०.३० वा.साप पकडण्यास गेले असता सापाने त्यांना दंश केला. नांदेड शहरातील आश्वीनी हॉस्पीटल येथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून औषधोपचारासाठी त्यांना रु.८०,०००/-खर्च झालेला आहे.शंकर रामचंद्र डोकुलवार हे साप पकडून व लोकांचे प्राण वाचवून एक प्रकारचे समाजकार्य करीत आहेत. औषधोपचारासाठी एवढा खर्च करण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसतांनाही त्यांना त्यांच्या परिचर्याच्या लोकांकडून पैसे उसने घेवून उपचार करावा लागत आहे.

करीता त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन महानगरपालिकेतर्फे त्यांना त्यांच्या उपचाराकरीता खर्च द्यावा तसेच त्यांच्या कामाची दखल घेवून त्यांना प्रतिमहा रु.५०००/-मानधन देण्याच्या निर्णयास्तव

**सुचक :-** श्रीमती कमलाबाई मुदिराज **अनुमोदक:-** विजय येवनकर

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२१),(२२),(२५),(२६),व (४१) प्रमाणे तयार केलेल्या अनुदान वाटप नियामवलीनूसार सदर बाब नियमावलीत बसत नसल्यामूळे श्री शंकर रामचंद्र डोकुलवार यांना औषधोपचारासाठी रु.८०,०००/- आणि दरमहा रुपये ५०००/- मानधन देता येणार नाही. करीता उक्त नियमातील तरतूदीनूसार श्री शंकर रामचंद्र डोकुलवार,यांना औषधोपचारासाठी रुपये ८०,०००/- आणि दरमहा रुपये ५०००/- मानधन देता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसान आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.३८** **ठराव**

सर्पमित्र शंकर रामचंद्र डोकुलवार, हे गेल्या २५ वर्षापासुन नांदेड शहरामधील विविध भागात नागरीकांच्या घरामधील सर्प पकडून त्यांना जंगलात सोडण्याचे काम करीत आहेत.दुदैवाने दि.७ जूलै २०१५ रोजी मुंजाजी नगर भागातील एका नागरीकांच्या घरी सकाळी १०.३० वा.साप पकडण्यास गेले असता सापाने त्यांना दंश केला. नांदेड शहरातील आश्वीनी हॉस्पीटल येथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले

असून औषधोपचारासाठी त्यांना रु.८०,०००/-खर्च झालेला आहे.शंकर रामचंद्र डोकुलवार हे साप पकडून व लोकांचे प्राण वाचवून एक प्रकारचे समाजकार्य करीत आहेत. औषधोपचारासाठी एवढा खर्च करण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसतांनाही त्यांना त्यांच्या परिचर्याच्या लोकांकडून पैसे उसने घेवून उपचार करावा लागत आहे.करीता त्यांच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करुन महानगरपालिकेतर्फे त्यांना त्यांच्या उपचाराकरीता आर्थिक मदत देण्यास तसेच त्यांच्या कामाची दखल घेवून त्यांना प्रतिमहा रु.५०००/-मानधन देण्यास मान्यता देण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याचसभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२२** **प्रस्ताव**

नांदेडचे भूमीपुत्र श्री शेषेराव मोरे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे सत्कार व अभिनंदन करणेसाठी ही सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक**:- संजय मोरे.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.३९** **ठराव**

नांदेडचे भूमीपुत्र श्री शेषेराव मोरे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे सत्कार व अभिनंदन करणेसाठी ही सभा सर्वानुमते मान्यता देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२३** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिकेतील कार्यरत कर्मचारी सिध्दार्थ बालाजी सोनकांबळे, पुरुष मजुर त्यांच्या पायाचे ऑपरेशन (जॉईट हिप रिप्लेसमेंट)करणे आवश्यक असल्याचे केईएम हॉस्पीटल, मुंबई येथील वैद्यकिय अधिका-यांनी यांनी सांगितले असून या ऑपरेशन करीता व औषधोपचारासाठी जवळपास रु. २-३ लक्ष अपेक्षित आहे. संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती
अत्यंत बिकट झालेली असल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांना नांदेड वाधाळा शहर महानगरपालिके तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु.३ लक्ष देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचकः-** सौ.अंजली सुरेशराव गायकवाड **अनुमोदकः-** बाळासाहेब देशमुख

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

महानगरपालिका अधिकारी:कर्मचारी यांना वैद्यकिय बिलांची प्रतिपुर्ती करण्यासाठी महानगरपालिकेतील अधिका-यांची समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीचा अहवाल तयार करण्यासचे काम प्रगतीपथावर आहे. समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर सर्व अधिकारी कर्मचारी यांचेसाठी वैद्यकिय बिलांच्या प्रतिपुर्तीची मर्यादा निश्चित होइल त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.तुर्त संबंधितास प्रस्तावातील मागणीनूसार वैद्यकिय बिलाची प्रतीपुर्ती करता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.४०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिकेतील कार्यरत कर्मचारी सिध्दार्थ बालाजी सोनकांबळे, पुरुष मजुर त्यांच्या पायाचे ऑपरेशन (जॉईट हिप रिप्लेसमेंट)करणे आवश्यक असल्याचे केईएम हॉस्पीटल, मुंबई येथील वैद्यकिय अधिका-यांनी यांनी सांगितले असून या ऑपरेशन करीता व औषधोपचारासाठी जवळपास रु. २-३ लक्ष अपेक्षित आहे. संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली असल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांना नांदेड वाधाळा शहर महानगरपालिके तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु.३ लक्ष देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.२४** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी श्री अशोक संतन्अप्पा घाळे. मुख्य लिपीक यांना दिनांक २३.१२.२०१४ रोजी ह्रदयविकाराचा झटका आल्याने त्यांना शहरातील अश्विनी हॉस्पीटल व संजिवनी हॉस्पीटल येथे एंन्जियोग्रॉफी केल्यानंतर पुढील उपचाराकरिता अदित्य बिर्ला हॉस्पीटल पुणे येथे एन्जिओप्लॉस्टी करण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांना ३,३४,११० (अक्षरी रु. तिन लक्ष चौतिस हजार एकशे दहा केवळ) एवढा खर्च झाला आहे.

करिता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निणर्य क्र.एमएजी/२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९ मार्च् २००५ च्या निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना औषधोपचाराचा वरील प्रत्यक्ष प्रमाणात ९० टक्के रक्कम देणे करिता ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ.सोनाबाई रा.मोकले **अनुमोदक**:- कमलाबाई रामस्वामी मुदिराज,नवल पोकर्णा डॉ.विश्वास कदम

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र. एमएजी/२०५५/प्रक्र.-१/आरोग्य -३ दि.१९.३.२००५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार महानगरपालिका अस्थापनेवरील कर्मचा-यांना औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती अनूज्ञेय रक्कम देणे बाबतचा उल्लेख नसल्यामूळै सेवा निवृत्त कर्मचारी श्री अशोक संतन अप्पा घाळे यांना औषधोपचारावरील खर्चाची रक्कम देता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.४१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी श्री अशोक संतन्अप्पा घाळे. मुख्य लिपीक यांना दिनांक २३.१२.२०१४ रोजी ह्रदयविकाराचा झटका आल्याने त्यांना शहरातील अश्विनी हॉस्पीटल व संजिवनी हॉस्पीटल येथे एंन्जियोग्रॉफी केल्यानंतर पुढील उपचाराकरिता अदित्य बिर्ला हॉस्पीटल पुणे येथे एन्जिओप्लॉस्टी करण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांना ३,३४,११० (अक्षरी रु. तिन लक्ष चौतिस हजार एकशे दहा केवळ) एवढा खर्च झाला आहे.

करिता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निणर्य क्र.एमएजी/२००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९ मार्च् २००५ च्या निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना औषधोपचाराचा वरील प्रत्यक्ष प्रमाणात ९० टक्के रक्कम देणे करिता ही सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**<u>पुरवणी विषय पत्रिका</u>**

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. 113 दि. 24.11.14 अन्वये अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. टिपीएस-3213/1542/प्र.क्र. 344/2013/नवि 30 दि. 30.04.14 च्या अनुषंगाने आरक्षण क्र. एफ-24 च्या कुंपनभिंत बाहेरील आरक्षणातील त्रिकोणी आकाराचे गावठाण सदृष्य भाग सुमारे 5102.35 चौ. मी. जागा आरक्षण क्र. एफ 24 ऐतिहासिक उद्यान मधून वगळून रहिवास भागात सामाविष्ट करण्यासाठी मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्तावा संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) मधील तरतुदीनूसार त्या संबंधीची प्ररुप अधिसुचना मराठी व इंग्रजी भाषेत सायं दै. नांदेड वार्ता मध्ये दि. 18.03.15 व दै. तहेलका टाईम्स (उर्दू) मध्ये दि. 18.03.2015 मध्ये मराठी व उर्दू भाषेत तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. 26.03.2015 रोजी पृष्ठ क्र. 6 व 7 वर प्रसिध्द झालेली आहे.
महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून विहित मुदतीत उक्त फेरबदलाबाबत एकही हरकती / सुचना महानगरपालिकेकडे सादर झालेली नाही.

तरी उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये प्रस्ताव शासनास सादर करणेच्या मंजूरीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड च्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव .

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.४२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. 113 दि. 24.11.14 अन्वये अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. टिपीएस-3213/1542/प्र.क्र. 344/2013/नवि 30 दि. 30.04.14 च्या अनुषंगाने आरक्षण क्र. एफ-24 च्या कुंपनभिंत बाहेरील आरक्षणातील त्रिकोणी आकाराचे गावठाण सदृष्य भाग सुमारे 5102.35 चौ. मी. जागा आरक्षण क्र. एफ 24 ऐतिहासिक उद्यान मधून वगळून रहिवास भागात सामाविष्ट करण्यासाठी मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्तावा संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) मधील तरतुदीनूसार त्या संबंधीची प्ररुप अधिसुचना मराठी व इंग्रजी भाषेत सायं दै. नांदेड वार्ता मध्ये दि. 18.03.15 व दै. तहेलका टाईम्स (उर्दू) मध्ये दि. 18.03.2015 मध्ये मराठी व उर्दू भाषेत तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. 26.03.2015 रोजी पृष्ठ क्र. 6 व 7 वर प्रसिध्द झालेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून विहित मुदतीत उक्त फेरबदलाबाबत एकही हरकती / सुचना महानगरपालिकेकडे सादर झालेली नाही. करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत लेबर कॉलनी येथील औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, लातूर विभाग ,यानी तत्कालिन नांदेड नगरपालिकेस एकूण १९८६ मध्ये एक अग्नीशमन विभागासाठी जागा दिली आहे. सध्या अग्नीशमन विभागाची सुसज्य इमारत बांधण्यासाठी गाळा क.२/१ व गाळा क्र.२/२४ लगत मोकळी जागा क्षेत्र अनुक्रमे ३४२.१४ चौ.मि. व २६२.८० चौ.मि.असून त्या जागेचे चालू वर्षाच्या शिघ्रग्रणक दरानुसार जागेचे मुल्यांकन रु.२५५२४२८/- व रु.१९६०५४४/- असे एकूण रु.४५१२९७२/-एवढे मुल्य होत असून कार्यकारी अभियंता,औरंगबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,लातूर विभाग यांनी सदर मुल्याची मागणी केली आहे.

तरी कार्यकारी अभियंता औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ लातूर विभाग यांना एकूण रु.४५१२९७२/-(अक्षरी रु.पंचेचाळीस लक्ष बारा हजार नवूसे बहात्तर फक्त) मुल्य देण्यासाठी मान्यता देणे बाबत.

**महापौर** आयुक्तांचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.४३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत लेबर कॉलनी येथील औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, लातूर विभाग ,यानी तत्कालिन नांदेड नगरपालिकेस एकूण १९८६ मध्ये एक अग्नीशमन विभागासाठी जागा दिली आहे. सध्या अग्नीशमन विभागाची सुसज्य इमारत बांधण्यासाठी गाळा क.२/१ व गाळा क्र.२/२४ लगत मोकळी जागा क्षेत्र अनुक्रमे ३४२.१४ चौ.मि. व २६२.८० चौ.मि.असून

त्या जागेचे चालू वर्षाच्या शिघ्रग्रणक दरानुसार जागेचे मुल्यांकन रु.२५५२४२८/- व रु.१९६०५४४/- असे एकूण रु.४५१२९७२/-एवढे मुल्य होत असून कार्यकारी अभियंता,औरंगबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,लातूर विभाग यांनी सदर मुल्याची मागणी केली आहे.

तरी कार्यकारी अभियंता औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ लातूर विभाग यांना एकूण रु.४५१२९७२/-(अक्षरी रु.पंचेचाळीस लक्ष बारा हजार नवूसे बहात्तर फक्त) मुल्य देण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.नांवाशमनपा-2015/प्र.क्र.9/नवि-24 दिनांक 16.07.2015 च्या पत्रान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 28 च्य कलम 448 (1) मधील तरतुदीचा वापर करुन आयुक्तांना आदेशीत करुन कलम 59 (अ) प्रमाणे सदरील प्रकरणात श्री माधव शंकर बाशेट्टी, शहर अभियंता यांचे विरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यात यावी असे आदेशीत केले होते. त्याप्रमाणे श्री माधव शंकर बाशेट्टी शहर अभियंता (निलंबीत) यांचे विरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली. (सुलभ संदर्भासाठी शासनाच्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे)

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र..नांवाशमनपा-2015/62/प्र.क्र.9/नवि-24 दिनांक 16.07.2015 अन्वये महानगरपालिका सर्वसाधारण सभेने पारीत केलेले ठराव क्र.219 दिनांक 24.11.2014 व ठराव क्र.119 दि.31.03.2015 हे दोन्ही ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 28 च्य कलम 451 (1) मधील तरतुदी

नुसार (3) महिण्याकरिता निलंबीत केलेले आहे. त्यामुळे उक्त दोन्ही ठराव विखंडीत करण्यास शासनास पाठविण्यात आलेले आहेत (सुलभ संदर्भासाठी शासनाच्या निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे)

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावाची नुसार नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.४४** **ठराव**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.नांवाशमनपा-2015/प्र.क्र.9/नवि-24 दिनांक 16.07.2015 च्या पत्रान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 28 च्य कलम 448 (1) मधील तरतुदीचा वापर करुन आयुक्तांना आदेशीत करुन कलम 59 (अ) प्रमाणे सदरील प्रकरणात श्री माधव शंकर बाशेट्टी, शहर अभियंता यांचे विरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यात यावी असे आदेशीत केले होते. त्याप्रमाणे श्री माधव शंकर बाशेट्टी शहर अभियंता (निलंबीत) यांचे विरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र..नांवाशमनपा-2015/62/प्र.क्र.9/नवि-24 दिनांक 16.07.2015 अन्वये महानगरपालिका सर्वसाधारण सभेने पारीत केलेले ठराव क्र.219 दिनांक 24.11.2014 व ठराव क्र.119 दि.31.03.2015 हे दोन्ही ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 28 च्य कलम 451 (1) मधील तरतुदी नुसार (3) महिण्याकरिता निलंबीत केलेले आहे. त्यामुळे उक्त दोन्ही ठराव विखंडीत करण्यास शासनास पाठविण्यात आलेले आहेत. त्याची नोंद ही नांवाशमना सर्वसाधारण सभा घेते.

**विषय क्र.४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 40 मधील तरतुदीनुसार परिवहन व्यवस्थापकाची नेमणुक करणे बाबतची तरतुद आहे. शहराचा वाढता विकास आणि वाहतुकीची होणारी कोंडी सोडविण्यासाठी ATAL MISSION FOR REJUVENTATION AND URBAN TRANSFORMATION (AMRUT) योजने अंतर्गत महानगरपालिकेचे स्वतंत्र वाहतुक यंत्रणा असणे बाबतची तयारी करणे अपेक्षीत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या दृष्टीने अहवाल तयार करणे, कागदपत्राची पुर्तता करणे इत्यादी कामासाठी एक अनुभवी व्यक्तीची विशेष कार्य अधिकारी म्हणुन नियुक्ती करणे अपेक्षित आहे.

करिता सदर पदास मान्यता महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीबीई-1893/प्र.क्र.38/13/दि.15.02.1995 च्या अधिन राहुन एका विशेष कार्य अधिका-यांची (OSD) यांची मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देणे बाबत.

**महापौर** आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.४५** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 40 मधील तरतुदीनुसार परिवहन व्यवस्थापकाची नेमणुक करणे बाबतची तरतुद आहे. शहराचा वाढता विकास आणि वाहतुकीची होणारी कोंडी सोडविण्यासाठी ATAL MISSION FOR REJUVENTATION AND URBAN TRANSFORMATION (AMRUT) योजने अंतर्गत महानगरपालिकेचे स्वतंत्र वाहतुक यंत्रणा असणे बाबतची तयारी करणे अपेक्षीत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या दृष्टीने अहवाल तयार करणे, कागदपत्राची पुर्तता करणे इत्यादी कामासाठी एक अनुभवी व्यक्तीची विशेष कार्य अधिकारी म्हणुन नियुक्ती करणे आवश्यक आहे.

करिता महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीबीई-1893/प्र.क्र.38/13/दि.15.02.1995 च्या अधिन राहुन विशेष कार्य अधिका-यांची (OSD) यांची मानधनावर नियुक्ती करण्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

**विषय क्र.५**

स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत प्रपत्र-1 व 2 भरुण घ्यावयाची प्रक्रीया चालु असुन प्रपत्र-2 मध्ये भरलेले फॉर्म महा-ई सुविधा केंद्रा मार्फत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावयाची कार्यवाही चालु आहे.

या योजनेतील पुढचा टप्पा स्थळनिरिक्षण व त्यानंतर अनुदानाचा पहिला हप्ता वितरण आहे.

वैयक्तीक घरकुल शौचालय बांधकामासाठी केंद्र शासनाचे रु.4000/- व राज्य शासनाचे रु.8000/- अनुदान मिळणार असुन या व्यतिरिक्त संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने काही निधी यासाठी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. या दोन्ही रक्कमे नंतर लागणारा खर्च लाभार्थ्याने स्वत:चा सहभाग म्हणून द्यावयाचा आहे.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.टीएफसी- 8015/प्र.क्र.106/नवि 4 दि 3.8.2015 नुसार 14 व्यावित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदानातुन मुलभूत अनुदानातून हाती घ्यावयाची कामे अंतर्गत अ(2) नुसार स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत बांधण्यात येणा-या वैयक्तीक तसेच सार्वजनिक शौचालयासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येते. तथापी त्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी स्वत:चा पुरकहिस्सा देणे आवश्यक असते. असा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा पुरक हिस्सा वैयक्तीक शौचालयासाठी कमाल मर्यादा रु.5000/- प्रतीसिट व सार्वजनिक शौचालयासाठी कमाल मर्यादा रु. 25000/- या अनुदानातून देता येईल. असे नमुद केलेले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके अंतर्गत या योजनेसाठी झालेल्या सर्वेक्षणानुसार 4202 लाभार्थी पात्र असुन अजुनही अर्ज येतच आहेत. त्याची छानणी करुन जे लाभार्थी पात्र होतील त्यांचा समावेश करुन घेण्यात येईल.

त्यानुसार महानगरपालिकेने आपला पुरक हिस्सा कमाल मर्यादा रु. 5000/- (अक्षरी पाच हजार केवळ ) वैयक्तीक शौचालयासाठी व रु.25000/- (अक्षरी पंचविस हजार केवळ) सार्वजनिक शौचालयासाठी भरणा करणेसाठी 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन भरणेसाठीचा प्रस्ताव महासभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**महापौर** वैयक्तीक शौचालयासाठी व सार्वजनिक शौचालयासाठी भरणा करणेसाठी 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन भरणेसाठीचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.४६** **ठराव**

केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत शहरात वैयक्तीक व सार्वजनिक शौचालयाचे बांधकामासाठी विशेष अनुदानाची योजना जाहिर केलेली असून त्यानुसार प्रपत्र-1 व 2 भरुण घ्यावयाची प्रक्रीया चालु आहे, प्रपत्र-2 मध्ये भरलेले फॉर्म महा-ई सुविधा केंद्रा मार्फत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावयाची कार्यवाही करण्यात येत आहे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने या योजने अंतर्गत शहरातील वैयक्तीक शौचालयाचा सर्वे केलेला असून सर्वेक्षणानुसार वैयक्तीक शौचालयाचे बांधकामासाठी एकूण 4202 लाभार्थी पात्र ठरले आहेत व अजुनही अर्ज प्राप्त होत असल्यामूळे . त्याची छानणी करुन जे लाभार्थी पात्र होतील त्यांचाही या योजनेत समावेश करुन घेण्यास मान्यता देण्यात येते.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तीक घरकुल शौचालय बांधकामासाठी केंद्र शासनाकडून रु.4000/- व राज्य शासनाकडून रु.8000/- अनुदान मिळणार असुन या व्यतिरिक्त संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने काही निधी यासाठी उपलब्ध करुन द्यावयाचा असून या दोन्ही रक्कमे नंतर लागणारा खर्च लाभार्थ्याने स्वत:चा सहभाग म्हणून द्यावयाचा आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. नगर विकास विभाग.टीएफसी- 8015/प्र.क्र.106/नवि 4 दि 3.8.2015 अन्वये 14 व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन महानगरपालिकेला आपला पुरक हिस्सा वैयक्तीक शौचालयासाठी कमाल मर्यादा रु.5000/- प्रतीसिट व सार्वजनिक शौचालयासाठी कमाल मर्यादा रु. 25000/- एवढी रक्कम देता येईल असे कळविलेले आहे.

करीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पात्र ठरणा-या लाभार्थ्यांच्या वैयक्तीक शौचालयाचे बांधकामासाठी महानगरपालिकेचा आपला पुरक हिस्सा कमाल मर्यादा रु. 5000/- (अक्षरी पाच हजार केवळ ) व सार्वजनिक शौचालयासाठी रु. 25000/- (अक्षरी पंचविस हजार केवळ) या प्रमाणे रक्कमेचा भरणा करणेसाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. तेविआ 2010/प्र.क्र. 131/2010/नवि-4. मंत्रालय मुंबई -32 दिनांक 25 ऑक्टोबर 2010 अन्वये 13 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी साल-सन 2010-11 या

आर्थिक वर्षापासुन पुढील पाच वर्षासाठी म्हणजे सन 2014-15 पर्यत सर्वसाधारण मुलभुत अनुदान रु. 2077.71 कोटी व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान रु. 1100.00 कोटी असे एकुण रु. 3177.71 कोटीचे केंद्रीय अनुदानाची शिफारस केलेली आहे.

केंद्र शासनाकडुन 13व्या वित्त आयोगातंर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस आजतागायत प्राप्त अनुदान खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. अनुदान | :- | 67.12 |
| 2. व्याज | :- | 00.68 |
| 3. 10,11 व 12वा वित्त आयोगातील शिल्लक | :- | 00.80 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | Transfer Entery | :- | 03.66 |
| | **एकुण** | :- | **72.26** |

उक्त शासन निर्णयातील प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगा बाबतची कार्य पध्दती अवलंबुन खालील बाबीवर खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | शिर्षक | रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| 1 | कर्मचा-यांचे थकीत वेतन | 5.62 |
| 2 | विविध शासकिय योजनेत मनपा सहभाग | 18.37 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन | 13.97 |
| 4 | PMDO व इतर कर्ज परतफेड | 15.59 |
| 5 | पाणी पुरवठा योजना + सांगवी पाणि पुरवठा योजनेसाठी तात्पुरते वळती (1.04+7.04) | 8.08 |
| 6 | भुसंपादन | 1.50 |
| 7 | गोडाऊन साठी जागा भुसंपादन बाबत | 7.13 |
| 8 | Truck Terminal बाबत जागा भुसंपादन करणे बाबत | 0.45 |
| 9 | श्री. शंकररावजी चव्हाण प्रक्षाग्रह | 0.15 |
| | एकुण | **70.86** |

तसेच शासन निर्णयातील निषक क्रं.3 मधील 13 व्या वित्त आयोगाच्या निधीचा विनियोगाची कार्यपध्दतीस अनुसरुन दि.04./07/2015 रोजी महानगरपालिका महासभेमध्ये झालेल्या चर्चेत ठरल्याप्रमाणे 13 व्या वित्त आयोगाचा निधी कोणकोणत्या शिर्षावर खर्च करावयाचा आहे या बाबत शासन निर्णयाच्या अधिन राहुन महसभेच्या मंजुरीनेच कामे करण्यात यावी त्यानुसार 13 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन विशेष बाब म्हणुन खालील प्रमाणे भांडवली स्वरुपाची कामे हाती घ्यावयाचे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | शिर्षक |
|---|---|
| | गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयमचा नव्याने विकास करणे |
| | स्वीमीगपुलचे नव्याने होणारे सर्व बाबीवरील नुतनीकरण करणे |
| | शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह सर्व बाबीवरील नुतनीकरण करणे |
| | आसना नदीवरुन पर्यायी पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा देणे |

उक्त प्रमाणे अ.क्र.1 ते 9 नुसार झालेला खर्च रु.70.86 कोटी यास कार्यत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी व यापुढे होणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान करणेस्तव तसेच अ.क्र.1 ते 4 नुसार हाती घ्यावयाच्या कामास लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावे.

**विरंद्रसिंघ गाडीवाले** — १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सांगवी पाणी पुरवठा योजनेसाठी तात्पुरती रक्कम वळती करण्यात आलेली असून शासनाकडून या योजने अंतर्गत निधी प्राप्त झाल्यानंतर तोनिधी १३ वित्त आयोगाच्या शिर्षकात जमा करण्यात यावा. व हा निधी महानगरपालिकेच्या मान्यतेने खर्च करण्यात यावा तसेच आसना नदीवरुन पर्यायी पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या शेतक-यांच्या जमिनीचा मावेजा देणे रु. १८.४७ लक्ष २) ट्रक टर्मीनल्स ( वाढीव रक्कम ) रु.४५.०० लक्ष ३) लेबर कॉलनी भागात नविन अग्नीशमन केंद्राचे बांधकामासाठी जागेचे भूसंपादन रु. ४५.१२ याप्रमाणे १३ वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात यावी व उवरीत शिल्लक निधी हा महानगरपालिकेच्या मान्यतेने करण्यात यावा अशी दुरुस्ती करुन मान्यता देण्यात यावी.

**अ.सत्तार** — श्री विरेद्रसिंघ गाडीवाले यानी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** — सभागृह नेते यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे दुरुस्ती करुन आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्याते येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ४७** **ठराव**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. तेविआ 2010/प्र.क्र. 131/2010/नवि-4. मंत्रालय मुंबई -32 दिनांक 25 ऑक्टोबर 2010 अन्वये 13 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी साल-सन 2010-11 या आर्थिक वर्षापासुन पुढील पाच वर्षासाठी म्हणजे सन 2014-15 पर्यत सर्वसाधारण मुलभुत अनुदान रु. 2077.71 कोटी व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान रु. 1100.00 कोटी असे एकुण रु. 3177.71 कोटीचे केंद्रीय अनुदानाची शिफारस केलेली आहे.

केंद्र शासनाकडुन 13व्या वित्त आयोगातंर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस आजतागायत प्राप्त अनुदान खालील प्रमाणे आहे.

1. अनुदान :- 67.12
2. व्याज :- 00.68
3. 10,11 व 12वा वित्त आयोगातील शिल्लक :- 00.80
4. Transfer Entery :- 03.66

**एकुण :- 72.26**

उक्त शासन निर्णयातील प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगा बाबतची कार्य पध्दती अवलंबुन खालील बाबीवर खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | शिर्षक | रक्कम (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| 1 | कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन | 5.62 |
| 2 | विविध शासकिय योजनेत मनपा सहभाग | 18.37 |
| 3 | घनकचरा व्यवस्थापन | 13.97 |
| 4 | PMDO व इतर कर्ज परतफेड | 15.59 |
| 5 | पाणी पुरवठा योजना + सांगवी पाणि पुरवठा योजनेसाठी तात्पुरते वळती (1.04+7.04) | 8.08 |
| 6 | भुसंपादन | 1.50 |
| 7 | गोडाऊन साठी जागा भुसंपादन बाबत | 7.13 |
| 8 | Truck Terminal बाबत जागा भुसंपादन करणे बाबत | 0.45 |
| 9 | श्री. शंकररावजी चव्हाण प्रक्षागृह | 0.15 |
| | **एकुण** | **70.86** |

शासन मार्गदर्शक तत्वानुसार उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेला खर्च हा महानगरपालिका सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता न घेता करण्यात आला हे अनुचित आहे.यापुढे असे १३ वा व १४ वा वित्त आयोगाच्या निधीतून करावयाचे खर्चास महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घेवूनच करण्यात यावा.तसेच पाणी पुरवठा योजना + सांगवी पाणी पुरवठा योजनेसाठी तात्पुरती वळती करण्यात आलेल्या रक्कमेचा निधी शासनाकडून मिळणार असुन शासनाकडून हा निधी प्राप्त झाल्यानंतर तो १३ व्या वित्त आयोगाच निधी या शिर्षकाखाली जमा करण्यात यावा व हा जमा करण्यात आलेला निधीचा विनियोग महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करण्यात यावा, असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व सदरील १ उक्त प्रमाणे अ.क्र.1 ते 9 नुसार झालेला खर्च रु.70.86 कोटी यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

तसेच शासन निर्णयातील निषक क्रं.3 मधील 13 व्या वित्त आयोगाच्या उपलब्ध्द निधीतून विशेष बाब म्हणुन कामाचे तातडी व निकड लक्षात घेवून प्राधान्याक्रमानुसार व उपलब्द निधीनूसार खालील प्रमाणे भांडवली स्वरुपाची कामे हाती घेण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | शिर्षक | रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| 1 | आसना नदीवरुन पर्यायी पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या शेतक-याच्या जमिनीचा नीचा मावेजा देणे | १८.४७ |
| 2 | ट्रक टर्मीनल्स ( वाढीव रक्कम ) | ४५.०० |
| 3 | लेबर कॉलनी भागात नविन अग्नीशमन केंद्राचे बांधकामासाठी जागेचे भूसंपादन | ४५.१२ |

<u>स. सदस्यांचे प्रस्ताव</u>

**विषय क्र.७** **प्रस्ताव**

व्हि.आय.पी.रोड (माता गुजरीजी विसावा उद्यान) ते गोकुळनगर १८ मी.रुंद रस्त्यावरुन नगर भूमापन क्र.६१३५ मधील मोकळया जागूतून पश्चिम पुर्व उत्तर बाजूने असलेल्या रस्त्याऐवजी पश्चित पुर्व दक्षिण बाजूने करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर मनपा अंतर्गत रस्ता क्र.२६ व्हि.आय.पी.रोड (माता गुजरीजी विसावा उद्यान) ते गोकुळनगर १८ मी.रुंद रस्त्या करण्यात आलेला आहे.त्या रस्त्यावरुन महादेव दाल मिल,महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळ याचे जागेलगत मोकळया भागातून व्हि.आय.पी.रोडवर येण्यासाठी रस्ता आहे. परंतू महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या जागेलगत पुर्व बाजूने मस्तानपुरा भागात दाट लोकवस्ती झालेली आहे. या नागरीकांना व्हि.आय.पी.रोड हा रस्ता जवळचा असूनही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळाच्या जागेला वळसा घालून महादेव दाल मिल या उभयंतांच्या मधील रस्त्याने जावे लागते त्यामूळे विनाकारण नागरीकांना त्रास सहन करावा लागेतो.तेव्हा अस्तित्वातील हा उत्तर बाजूचा रस्ता रध्द करुन हि जागा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळास हस्तांतर करण्यात येवून

त्याऐवजी दक्षिणबाजूने दाट लोकवस्ती लगत महाराष्ट्र कृषि विकास महामंडळाचे मोकळया जागेतून रस्ता केल्यास मस्तानपुरा येथील नागरीकांना सोईचा मुख्य रस्त्यावर येण्यासाठी व नागरीकांना पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन इतर मुलभूत सुविधा देणे सोईचे होईल ,यामूळे महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही.

करीता प्रस्तावित नविन रस्ता करण्याकरीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- कमलाबाई रामस्वामी मुदिराज **अनुमोदक**:- विजय येवनकर

**प्रशासकीय टिप्पणी**

उपरोक्त विषयी वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने व स.सदस्या सोबत झालेल्या चर्चेनुसार विषयांकित सी.स.नं.६१३५ जागा ही नांदेड शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेनुसार वाणिज्य वापराकरीता दर्शविलेली आहे. व त्यावर गोडावून असे नमूद आहे.सदरील जागेची मालकी प्रस्तावात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ यांची दिसून येते. नांदेड शहर विकास योजना नकाशानुसार सदरील जागेच्या उत्तर बाजूने दक्षिणपुर्व रस्ता दर्शविलेला आहे. व तो विद्यमान अस्तित्वातील रस्ता आहे त्याऐवजी प्रस्तावानुसार विषयांकित जागेच्या पुर्व बाजूने उत्तर दक्षिण करणे बाबतचा प्रस्ताव आहे. जेणे करुन सदर जागेच्या पुर्व बाजूच्या वस्ती लगत नागरीकांना जाणे येण्याकरीता सुलभता होईल सदर वस्ती ही जुनी असून त्या भागाचा अभिन्यास महानगरपालिकेनेतर्फे झालेला नाही. सदर जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची नसून प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ यांची दिसून येते. तसेच म्हणजे विकास योजना नकाशा नुसार विषयांकित भागातील नागरीकांना येण्या जाण्यासाठी विद्यमान रस्ते दिसून येतात त्यामूळे प्रस्तावानुसार रस्ता करण्याची आवश्यकता वाटत नाही. त्या अनुषंगाने सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सादर.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.४८** **ठराव**

व्हि.आय.पी.रोड (माता गुजरीजी विसावा उद्यान) ते गोकुळनगर १८ मी.रुंद रस्त्यावरुन नगर भूमापन क्र.६१३५ मधील मोकळया जागूतून पश्चिम पुर्व उत्तर बाजूने असलेल्या रस्त्याऐवजी पश्चित पुर्व दक्षिण बाजूने करणे बाबत.नांदेड वाघाळा शहर मनपा अंतर्गत रस्ता क्र.२६ व्हि.आय.पी.रोड (माता गुजरीजी विसावा उद्यान) ते गोकुळनगर १८ मी.रुंद रस्त्या करण्यात आलेला आहे.त्या रस्त्यावरुन महादेव दाल मिल,महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळ याचे जागेलगत मोकळया भागातून व्हि.आय.पी.रोडवर येण्यासाठी रस्ता आहे. परंतू महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या जागेलगत पुर्व बाजूने मस्तानपुरा भागात दाट लोकवस्ती झालेली आहे. या नागरीकांना व्हि.आय.पी.रोड हा रस्ता जवळचा असूनही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळाच्या जागेला वळसा घालून महादेव दाल मिल या उभयंतांच्या मधील रस्त्याने जावे लागते त्यामूळे विनाकारण नागरीकांना त्रास सहन करावा लागेतो.तेव्हा अस्तित्वातील हा उत्तर बाजूचा रस्ता रध्द करुन हि जागा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामडळास हस्तांतर करण्यात येवून त्याऐवजी दक्षिणबाजूने दाट लोकवस्ती लगत महाराष्ट्र कृषि विकास महामंडळाचे मोकळया जागेतून रस्ता केल्यास मस्तानपुरा येथील नागरीकांना सोईचा मुख्य रस्त्यावर येण्यासाठी व नागरीकांना पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन इतर मुलभूत सुविधा देणे सोईचे होईल ,यामूळे महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही. करीता प्रस्तावित नविन रस्ता करण्याकरीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**विषय क्र.८** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील हद्दीत जुन्या व जीर्ण झालेल्या ईमारतीची संख्या नेमकी किती आहे याबाबतचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून अशा जीर्ण इमारतीबाबत कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडुन मनुष्यहानी न होण्याकरिता काळजी घेणे आवश्यक आहे.करिता भविष्यात दुर्घटना टाळण्यासाठी महापालिका हद्दीत असलेल्या जीर्ण इमारतीचे सर्वेक्षण करण्यात यावे व योग्य ती कार्यवाही करण्यात यावी या प्रस्तावास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- डॉ.विश्वास बालाजीराव कदम **अनुमोदक**:- उमेश पवळे, संजय मोरे, नवल पोकर्णा, कमलाबाई मुदीराज

**प्रशासकीय टिप्पणी**

१) क्षेत्रिय कार्यालय क्र. अ तरोडा-सांगवी अंतर्गत जिर्ण व मोडकळीस आलेल्या ईमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले असुन अशी कोणतीही ईमारत किंवा मालमत्ता या क्षेत्रिय कार्यालयाच्या आखत्यारित असणा-या परिक्षेत्रात आढळुन आलेली नाही.

२) क्षेत्रिय कार्यालय क्र. ब अंतर्गत फक्त एक मोडकळीस आलेली इमारत असून ज्याचा मनपा मालमत्ता क्र.१.६.५० असून मालमत्ताधारकाचे नाव श्री भगवानराव रघुनाथराव कांबळे यांचा मालमत्तेचा पश्चिमेकडील तळमजल्याचा भाग मोडकळीस आलेला असून संबंधितांना नोटीस देण्यात आलेली आहे. सदर घरामध्ये वास्तव्यासाठी कोणतेही कुटुंब राहत नाही.

३) क्षेत्रिय कार्यालय क्र. ड सिडकोच्या कार्यक्षेत्रातील मोडकळीस आलेल्या इमारतीसंबंधी मान्सुनपूर्व सर्व्हेक्षण करण्यात आले होते. त्याअनुषंगाने एकूण (16) इमारती मोडकळीस आल्याबाबतचा अहवाल प्रापत झाल्यानुसार सर्वे संबंधीत मालमत्ताधारकांना BPMC ACT 1949 चे कलम 264 अन्वये नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

**महापौर** स.सदस्यांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ४९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील हद्दीतील जुन्या व जीर्ण झालेल्या ईमारती पडून कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडुन मनुष्यहानी न होण्याकरिता काळजी घेणे आवश्यक आहे.करिता भविष्यात दुर्घटना टाळण्यासाठी महापालिका हद्दीत असलेल्या जीर्ण

इमारतीचे सर्वेक्षण करुन अशा जिर्ण व मोडकळीस आलेल्या इमारती विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानूमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

**विषय क्र.९** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत डॉ.राम मनोहर लोहिया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका मुख्य इमारतीमध्ये होती. सदर अभ्यासिकेस मोठे वैभव प्राप्त होते परंतु मनपाची नविन इमारत बांधण्यासाठी डॉ.राम मनोहर लोहिया ग्रंथालय,हे तरोडेकर मंगल कार्यालय वजिराबाद नांदेड येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. सदर इमारत ही अतिषय जुनी व जीर्ण झाली असून सदर इमारतीत पावसाळयात गळतीचे प्रमाण जास्त असल्यामूळे इमारत जास्त जिर्ण होवून खचली आहे. सदर इमारतीमध्ये डॉ.राम मनोहर ग्रंथालय वाचनालय व अभ्यसिका असून यामूळे नागरीकांना विशेषत: विद्यार्थ्यांना व वाचनाकाना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. व तेथील वातावरण अभ्यासासाठी अनुकुल नाही तसेच सदर इमारत मुख्य बाजार येथे आहे.

शहराच्या मध्यवर्ती जागी असलेल्या वजिराबाद येथील मनपा शाळेच्या पाठीमागील मोठया प्रमाणात मोकळी जागा असून सदर ठिकाणी डॉ.राम मनोहर लोहिया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका करीता नविन इमारतीचे बांधकाम केल्यास सदर ग्रंथालयास गतवैभवप्राप्त होईल.

वजिराबाद येथील मनपा शाळेच्या पाठीमागील मोकळया जागेत डॉ.राम मनोहर ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका करीता नविन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :**-शफि अहेमद कुरेशी **अनुमोदक :**- किशोर यादव,आनंद चव्हाण

**प्रशासकीय टिप्पणी**

नांवाशमनपाकेत डॉ.राम मनोहर लोहीया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका मुख्य इमारतीमध्ये होती. सदर वाचनालय PPP तत्वावर विकसीत करण्यात येणा-या तरोडेकर मार्केट येथे तिस-या मजल्यावर करण्याची प्रस्तावीत आहे. तसेच तरोडेकर मार्केट व महात्मा फुले संकुल PPP तत्वावर विकसीत करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसाठी ठेवण्यात आलेला आहे किंवा सदर डॉ.राम मनोहर लोहीया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका ही गणेश नगर येथील ग्रंथालयाच्या जागेत PPP तत्वावर विकसीत करण्यात स्थालांतरीत करण्याचे नियोजित आहे.

**महापौर** स.सदसांच्या प्रस्तावावर देण्यात आलेल्या प्रशासकीय टिप्पणीनुसार डॉ.राम मनोहर लोहीया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका PPP तत्वावर विकसीत करण्यात येणा-या तरोडेकर मार्केट येथे तिस-या मजल्यावर करण्याची प्रस्तावीत असल्यामूळे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.५०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत डॉ.राम मनोहर लोहिया ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका PPP तत्वावर विकसीत करण्यात येणा-या तरोडेकर मार्केट येथे तिस-या मजल्यावर करण्याची प्रस्तावीत असल्यामूळे वजिराबाद येथील मनपा शाळेच्या पाठीमागील मोकळया जागेत डॉ.राम मनोहर ग्रंथालय वाचनालय व अभ्यासिका करीता नविन इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र. १०** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीतील प्रभाग क्र.३६ मधील दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत शासन निर्णय क्र.विहायो/2014/प्र.क्र.98/नवि-4/दिनांक 08.08.2014 अन्वये व महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.०८.२०१४ मधील अनु.क्रमांक ६५ प्रभाग क्रं.३६ वसरणी, रहीमपुर येथील बुध्दविहाराच्या जागेला सरंक्षण भिंत बांधणे व सभागृहाचे बांधकाम करणे असे आहे. त्याठिकाणी जागे अभावी सदरील काम रद्य करुन त्याच ठिकाणी त्याच दलित वस्तीतील बाजुचा रोड म्हणजे साखरे यांच्या घरापासुन बुध्दविहार मार्गे वाघमारे यांच्याघरापर्यंत व अनुक्रमांक ७३ प्रभाग क्र.३६ वसरणी येथे लातुर रोड ते मधुकर ढवळे यांच्या घरापर्यंत डब्ल्युबीएम व सीसी रस्ता असे आहे त्यावेएवजी लातुर रोड ते नारायण पवळे, सखाराम शितळे, भिवाजी वडजे वंजारे मार्गे विठ्ठल मोरे यांचे घरापर्यंत सी.सी रोड करण्याकरीता मान्यता देणे बाबत

**सुचक :**- संजय मोरे **अनुमोदक :**- सतिष राखेवार, श्रीनिवास सातेलीकर

**प्रशासकीय टिप्पणी**

दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या कामाचे कार्यवाही शासन निणर्य क्र.विघयो-10200/1592/प्र.क्र.189/नवि-4 दिनांक 05.03.2002 अन्वये करण्यात येईल तसेच दलित वस्ती अंतर्गतची कामे दलित वस्ती कक्षाकडुन अभिप्राय घेवुन निधी उपलब्धतेनुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल..

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.५१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीतील प्रभाग क्र.३६ मधील दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत शासन निर्णय क्र.विहायो/2014/प्र.क्र.98/नवि-4/दिनांक 08.08.2014 अन्वये व महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.०८.२०१४ मधील अनु.क्रमांक ६५ प्रभाग क्रं.३६ वसरणी, रहीमपुर येथील बुध्दविहाराच्या जागेला सरंक्षण भिंत बांधणे व सभागृहाचे बांधकाम करणे असे

आहे. त्याठिकाणी जागे अभावी सदरील काम रद्य करुन त्याचठिकाणी त्याच दलित वस्तीतील बाजुचा रोड म्हणजे साखरे यांच्या घरापासुन बुध्दविहार मार्गे वाघमारे यांच्याघरापर्यंत व अनुक्रमांक ७३ प्रभाग क्र.३६ वसरणी येथे लातुर रोड ते मधुकर ढवळे यांच्या घरापर्यंत डब्ल्युबीएम व सीसी रस्ता असे आहे त्याऐवजी लातुर रोड ते नारायण पवळे, सखाराम शितळे, भिवाजी वडजे वंजारे मार्गे विठ्ठल मोरे यांचे घरापर्यंत सी.सी रोड करण्याकरीता ही नांवामनपा सर्वसारण सभा मान्यता देते. आयुक्तांनी शासन निर्णय क्र. क्र.विहायो/2014/प्र.क्र.98/नवि-4/दिनांक 08.08.2014 नुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ११** **प्रस्ताव**

दिनांक ०८.०८.२०११ रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.८७ ची अंमलबजावणी करुन श्री रविराज गंगाधर जोंधळे, संगणक चालक यांना कंत्राटी संगणक चालक पदी नियुक्ती देण्यात यावी. श्री रविराज गंगाधर जोंधळे हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत चार वर्षापर्यंत लेखी व मौखिक आदेशान्वये संगणक चालकाचे काम केले आहे. संबंधीतानी गत चार वर्षामध्ये महानगरपालिकेतील विविध विभागात काम केलेले आहे तसेच सध्या ते मागील तीन वर्षापासुन ते आज उद्या माझ्या ठरावाची अंमलबजावणी होईल या आशेने विनावेतनी वेळोवेळी मा.विरोधी पक्ष नेता कक्षात संगणक चालक म्हणुन काम करत असुन त्यांना प्रशासकीय कामाचा चांगला अनुभव आहे.

मनपा प्रशासनामार्फत 25 डाटा एन्ट्री ऑपरेटर पदे कंत्राटी तत्वावर भ्रण्यात आलेली आहेत. सध्यस्थितीत 25 पैकी निम्याहुन अधिक जागा रिक्त आहेत. महानगरपालिकेतील संगणकीय कामाचा वाढता व्याप लक्षात घेता सदरील रिक्त असलेल्या जागेवर डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणुन श्री रविराज गंगाधर जोंधळे यांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यात यावी जेणेकरुन मनपा प्रशासनातील संगणकीय कामात गतिमानता येईले.. तसेच संबंधीतांनी महानगरपालिकेत काम करत असल्यामुळे त्यांना कंत्राटी नियुक्त दिल्यास महानगरपालिकेचे कार्यालयीन कामात सुसुत्रता येईल.

संबंधीतांनी आजपर्यंत महानगरपालिकेमध्ये वेगवेगळया विभागात तुटपुंज्या मानधनावर काम करुन महानगरपालिकेच्या वेळोवेळी अत्यंत महत्वाच्या कामात जसे की, सार्वत्रिक निवडणुक २००७, गुरु-त्ता-गद्दी सोहळा २००८, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, पाणि पुरवठा विभाग, सांबावि, मनपाकेच क्षेत्रिय कार्यालय, जकात विभाग, बीएसयुपी विभागात लाभार्थी यादी टायपींग व अंतिम करणे, सार्वत्रिक निवणुक -२०१२ तसेच मागील तीन वर्षापासुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार विनावेतन मा.विरोधी पक्षनेता कक्षात काम करुन सहकार्य करीत आहे. संबंधीतांची परिस्थिती अत्यंत गरीब व हलाखीची असल्यामुळे त्यांनी आज मितीस मनपासाठी केलेल्या कामाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन संबंधीतांना उक्तप्रमाणे रिक्त असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर(कंत्राटी) यावर नियुक्ती देणेसाठी वरील नमुद ठरावाची अंमलबजावणी करण्यास ही सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देवुन हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** बालाजी देविदासराव कल्याणकर **अनुमोदक :-** विनय गुर्रम, अशोक रावणराव उमरेकर,सुंदरलाल (तुलजेस) गुरुखुदे, सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे

**प्रशासकीय टिप्पणी**

नांवामनपाकेत डाटा एंट्री ऑपरेटरची २५ पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात मासिक एकत्रित वेतन रु.६०००/-वर नियुक्ती करण्यात आली होती.सध्यस्थितीत त्यापेकी ९ कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर कार्यरत आहेत.

नांवामनपाकेने दि.८.८.२०११ रोजी संमत केलेला ठराव क्र.८७ अन्वये श्री रविराज गंगाधर जोंधळे यांना रिक्त असलेल्या कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यापदावर नियुक्ती देणेसाठीचा सदरील ठराव पारीत करण्यात आला होता.तथापी सरळ सेवेची पदे भरतांना त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून लेखीपरिक्षा घेवून विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदरील पदे भरण्यात येतात त्यामूळे कार्यालयीन प.क्र.नावांशमनपा/अस्था-६/१०६९४/१२ दि.२३.१.२०१२ अन्वये नांवामनपा सर्वसाधारणसभा ठराव क्र.८७ दि.८.८.२०११ हा ठराव विखंडीत करण्यासाठी मा.प्रधान सचिव (१) नगरविकास विभाग -३२ यांना कळविण्यात आले आहे.

नावामनपाकेत अनुशेषानूसार कंत्राटी व सरळ सेवेने पदे भरतांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येतो.जसे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणे, लेखी परिक्षा व आवश्यक असल्यास प्रात्यक्षित घेवून गठित केलेल्या निवड समिती समोर तोंडी मुलाखती घेवून गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड व नियुक्ती करण्यात येते.

करीता नावामनपाकेने संमत केलेला ठराव क्र.८७ दि.८.८.२०११ हा विखंडीत करण्याबातची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन असल्यामूळे प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री रविराज गंगाधर जोंधळे यांना रिक्त असलेल्या कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यापदावर नियुक्ती देता येणार नाही.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव क्र.५२** **ठराव**

दिनांक ०८.०८.२०११ रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.८७ ची अंमलबजावणी करुन श्री रविराज गंगाधर जोंधळे, संगणक चालक यांना कंत्राटी संगणक चालक पदी नियुक्ती देण्यात यावी. श्री रविराज गंगाधर जोंधळे हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत चार वर्षापर्यंत लेखी व मौखिक आदेशान्वये संगणक चालकाचे काम केले आहे. संबंधीतानी गत चार वर्षामध्ये महानगरपालिकेतील विविध विभागात काम केलेले आहे तसेच सध्या ते मागील तीन वर्षापासुन ते आज उद्या माझ्या ठरावाची

अंमलबजावणी होईल या आशेने विनावेतनी वेळोवेळी मा.विरोधी पक्ष नेता कक्षात संगणक चालक म्हणुन काम करत असुन त्यांना प्रशासकीय कामाचा चांगला अनुभव आहे.

मनपा प्रशासनामार्फत 25 डाटा एन्ट्री ऑपरेटर पदे कंत्राटी तत्वावर भ्रण्यात आलेली आहेत. सध्यस्थितीत 25 पैकी निम्याहुन अधिक जागा रिक्त आहेत. महानगरपालिकेतील संगणकीय कामाचा वाढता व्याप लक्षात घेता सदरील रिक्त असलेल्या जागेवर डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणुन श्री रविराज गंगाधर जोंधळे यांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यात यावी जेणेकरुन मनपा प्रशासनातील संगणकीय कामात गतिमानता येईले.. तसेच संबंधीतांनी महानगरपालिकेत काम करत असल्यामुळे त्यांना कंत्राटी नियुक्त दिल्यास महानगरपालिकेचे कार्यालयीन कामात सुसुत्रता येईल.

संबंधीतांनी आजपर्यंत महानगरपालिकेमध्ये वेगवेगळया विभागात तुटपुंज्या मानधनावर काम करुन महानगरपालिकेच्या वेळोवेळी अत्यंत महत्वाच्या कामात जसे की, सार्वत्रिक निवडणुक २००७, गुरु-त्ता-गद्दी सोहळा २००८, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, पाणि पुरवठा विभाग, सांबावि, मनपाकेच क्षेत्रिय कार्यालय, जकात विभाग, बीएसयुपी विभागात लाभार्थी यादी टायपींग व अंतिम करणे, सार्वत्रिक निवणुक -२०१२ तसेच मागील तीन वर्षापासुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार विनावेतन मा.विरोधी पक्षनेता कक्षात काम करुन सहकार्य करीत आहे. संबंधीतांची परिस्थिती अत्यंत गरीब व हलाखीची असल्यामुळे त्यांनी आज मितीस मनपासाठी केलेल्या कामाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन संबंधीतांना उक्तप्रमाणे रिक्त असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर(कंत्राटी) यावर नियुक्ती देणेसाठी वरील नमुद ठरावाची अंमलबजावणी करण्यास ही सर्वसाधारणसभा सर्वानुमते मान्यता देवुन हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नांवाशमनपा हदीतीलप्रभाग क्र.४ मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.वि.हा.यो./ २०१४/ प्र.क्र.९५/नवि-४ दि.८.८.२०१४ अन्वये व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ मधील अनुक्रमांक ९८ प्र.क्र.६ वर ताजनगर दलित वस्ती भागात गिरणीपासून ते मेनरोड पर्यत सिसि रोड व नालीचे बांधकाम करण्यासाठी अशी मंजुरी मिळालेली आहे, परंतु ताजनगर हे नाव चुकीने पडले असून ते गांधीनगर असे आहे. तरी नांवामनपा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ गांधीनगर दलित वस्ती भागात सोनारगल्ली ते मेनरोड पर्यत सिसि रोड व नालीचे बांधकाम करणे अशी दुरुस्ती करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ.सविता मारोतराव कंठेवाड **अनुमोदक** :- सौ.शिला कदम

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या कामाचे कार्यवाही शासन निणर्य क्र.विघयो-10200/1592/प्र.क्र.189/नवि-4 दिनांक 05.03.2002 अन्वये करण्यात येईल तसेच दलित वस्ती अंतर्गतची कामे दलितवस्ती कक्षाकडुन अभिप्राय घेवुन निधी उपलब्धतेनुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल..

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.५३** **ठराव**

नांवाशमनपा हदीतीलप्रभाग क्र.४ मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.वि.हा.यो./ २०१४/ प्र.क्र.९५/नवि-४ दि.८.८.२०१४ अन्वये व मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ मधील अनुक्रमांक ९८ प्र.क्र.६ वर ताजनगर दलित वस्ती भागात गिरणीपासून ते मेनरोड पर्यत सिसि रोड व नालीचे बांधकाम करण्यासाठी अशी मंजुरी मिळालेली आहे, परंतु ताजनगर हे नाव चुकीने पडले असून ते गांधीनगर असे आहे. तरी नांवामनपा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ गांधीनगर दलित वस्ती भागात सोनारगल्ली ते मेनरोड पर्यत सिसि रोड व नालीचे बांधकाम करणे अशी दुरुस्ती करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. आयुक्तांनी शासन निर्णय क्र. क्र.विहायो/2014/प्र.क्र.98/नवि-4/दिनांक 08.08.2014 नुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१३** **प्रस्ताव**

नांवामनपाकेच्या विविध विभागातील चतुर्थश्रेंणी व तृतिय श्रेणी कर्मचारी हे कर्तव्य बजावत असतांना मृत्यूमूखी पडतात परंतु त्यांच्या वारसांना अनुकंपा धर्तीवर तात्काळ महानगरपालिकेच्या सेवेत घेतल्या जात नाही त्यामूळे त्यांच्या कुटूंबावर उपास मारीची वेळ येते म्हणून चतुर्थश्रेंणी व तृतिय श्रेणी संवर्गातील कर्तव्यावर ज्या कर्मचा-याचे निधन होते त्यांच्या पाल्यांना तात्काळ महानगरपालिकेमध्ये अनुकंपाधर्तीवर नौकरी देण्यासबंधी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते .व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक** :- फारुख अली खॉ इलियास खॉ **अनुमोदक** :- सतिष शेषप्पा राखेवार

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.५४** **ठराव**

नांवामनपाकेच्या विविध विभागातील चतुर्थश्रेंणी व तृतिय श्रेणी कर्मचारी हे कर्तव्य बजावत असतांना मृत्यूमूखी पडतात परंतु त्यांच्या वारसांना अनुकंपा धर्तीवर तात्काळ महानगरपालिकेच्या सेवेत घेतल्या जात नाही त्यामूळे त्यांच्या कुटूंबावर उपास मारीची वेळ येते म्हणून चतुर्थश्रेंणी व तृतिय श्रेणी संवर्गातील कर्तव्यावर ज्या कर्मचा-याचे निधन होते त्यांच्या पाल्यांना तात्काळ महानगरपालिकेमध्ये

अनुकंपाधर्तीवर नौकरी देण्यासबंधी ही सर्वसाधारण सभा मान्यता देते .व हा ठराव याच सभेत कायम करते नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. .

**विषय क्र.१४** **प्रस्ताव**

बिएसयुपी अंतर्गत लालवाडी तेहरानगर,श्रावस्तीनगर व सादतनगर व पप्पड गल्ली येथील लोकांच्या पावत्या घरकुलासाठी फाडण्यात आल्या त्यांना घरे देण्याबाबत नावाशमनपा नांदेडकडून आज पर्यत काढण्यात आलेल्या वरील सर्व लोकांन घरे मिळावे.

**सुचक** अंजलीताई गायकवाड **अनुमोदक:-** बाळासाहेब देशमुख

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो तसेच इतरही नागरीकांनी घराचे बांधकामाचे पैसे भरलेले असल्यास त्यांनाही घरे देण्याबाबत नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.५५** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील लालवाडी तेहरानगर,श्रावस्तीनगर व सादतनगर व पप्पड गल्ली येथील व शहरातील इतरही नागरीकांनी बिएसयुपी अंतर्गत घराचे बांधकामासाठी पैसे भरलेले असल्यामूळे त्यांना बिएसयुपी योजने अंतर्गत घरे बांधून देण्यासाठी नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा संमत करते .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१५** **प्रस्ताव**

हिंगोली गेटच्या उडडाण पुलाखालील रेल्वे पटटरीच्या उत्तर बाजूस असलेली मनपाची मोकळी जागा भाडे तत्वावर देण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचक :-** स.जानी म.कासीम **अनुमोदक :-** ईतरत फातेमा स.मजहर

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगनगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा दि.24.11.2014 ठराव क्र.111 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगपालिका मालकीची जागा किंवा दुकान भाडेपट्टीवर दयावयाचे असल्यास मा.आयुक्त व मा.महापौर यांचे मान्यतेने दै.वृत्तपत्रात जाहीर सुचना देवुन भाडेपट्टीवर देण्यात येते म्हणुन के.एस.टुर्स ऍ़न्ड ऑटो डिल्स या संस्थेला हिंगोली गेट उड्डाण पुलाखालील 30 x 40 फुटाची मोकळी जागा भाडे तत्वावर देता येणार नाही.

**स.जानी म.कासिम** के.एस.टुर्स ऍ़न्ड ऑटो डिल्स यां संस्थेने हिंगोली गेट उडडाण पुलाखालील 30 x 40 फुटाची मोकळी जागा भाडेपटीवर देण्याची मागणी केलेली असल्यामूळे सदर संस्थेस भाडेपटीवर जागा देण्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने हिंगोली गेटच्या उडडाण पुलाखालील रेल्वे पटटरीच्या उत्तर बाजूस व दक्षिण बाजूस असलेल्या मोकळया जागेच्या विनियोगा बाबत यापुर्वीच निर्णय धेतलेला असल्याची माहिती मिळाल्यामूळे स. सदस्यांचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.५६** **ठराव**

हिंगोली गेटच्या उडडाण पुलाखालील रेल्वे पटटरीच्या उत्तर बाजूस असलेली मनपाची 30 x 40 फुटाची मोकळी जागा भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सवानुमते ना मंजुर करते.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड